# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०१ एप्रिल, २०१५ / चैत्र ११, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८४**

---

**पुणे महानगरपालिकेने वाहतूक नियोजन, नवे उड्डाणपूल तसेच पाणीपुरवठा इत्यादी नवे प्रकल्प प्रस्तावित केल्याबाबत**

**(१) * २८५५ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने वाहतूक नियोजन, नवे उड्डाणपूल तसेच पाणीपुरवठा आदि कामांकरिता माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नवे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे नवे प्रकल्प कोणकोणते आहेत,

(३) असल्यास, याकरिता किती निधीची तरतूद केली आहे,

(४) सदरचे प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाहतुक नियोजन, नवे उड्डाणपूल याकरिता तरतूद प्रस्तावित केली असून, असे प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या मंजूरीच्या प्रक्रियेत आहे.

तथापि, पाणीपुरवठा विभागाकरिता कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.

(२) व (३) वाहतुक नियोजन व नवीन उड्डाणपूलांचे प्रस्तावित प्रकल्प व त्यासाठी केलेली आर्थिक तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

१) वाहनतळ सुधारणा - रुपये २.२० कोटी
२) नवीन सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करणे - रुपये २.०० कोटी
३) चौक सुधारणा - रूपये ४.५० कोटी
४) वाहतुक पोलिस विभागामार्फत सुचविणेत आलेली कामे - ३.०० कोटी
५) पुणे मेट्रो प्रकल्प - २५.०० कोटी

६) मुंढवा स.नं.८९ व ७१ दरम्यानचे पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४ मी. एचसीएमटीआर (High Capacity Mass Transit Route) साठी रेल्वे ओलांडणी पूल बांधणे - रुपये ४.५० कोटी

७) घोरपडी येथे रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधणे - रुपये ४५ लाख

८) पौड रस्त्यावर चांदणी चौक येथे उड्डाणपूल बांधणे - रुपये ४५ लाख

९) हॅरिस पुलाजवळ नवीन पूल बांधणे - (पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा संयुक्तपणे) - रुपये ९० लाख

१०) नगर रोड येथे हरिभाऊ देसाई चौकात भुयारी मार्ग बांधणे - रुपये ९० लाख

११) कात्रज बायपास चौकात उड्डाणपूल व भुयारी मार्ग बांधणे - रुपये ४५ लाख

१२) पु.ल. देशपांडे उद्यानासमोर पादचारी पूल, भुयारी मार्ग बांधणे - रुपये ७५ लाख

१३) मुठा नदीवर डेंगळे पूलानजिक नवीन पूल बांधणे - रुपये २.२५ कोटी

उपरोक्त नमूद केलेली तरतूद ही प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात एका वर्षाकरिता लागणा-या रकमेनुसार प्रस्तावित आहे. सदर सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी ही पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेच्या मान्यतेनंतरच हाती घेणेत येणार आहे.

(४) प्रस्तावित प्रकल्पांना मुख्य सभेने मान्यता दिल्यानंतर सदर कामांच्या प्रकल्पीय तरतूदी पूर्वगणनपत्रकाद्वारे निश्चित करुन, निविदा मागविताना या प्रकल्पांचा कालावधी निश्चित करणेत येणार आहे.

-----------------

### राज्यात सायबर गुन्ह्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ

**(२) * ३७९४ श्री.विजय गिरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह इतर मोठ्या शहरामध्ये सायबर गुन्ह्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे विविध पाहणीत आढळल्याने सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच दाखल गुन्ह्यांवर तातडीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात विशेषत: मुंबईत हजारो लोक ऑनलाईन व्यवहार पंसत करीत असल्याने याचा फायदा काही भामट्यांनी उचलला असून जस्ट डायल ही कंपनी प्लंबरपासून ते गुप्तहेरांचे क्रमांक नोंदवून सेवा प्रदान करीत असते. झुबेर खान नावाच्या सराईत चोराने जस्ट डायलमध्ये चार वेगवेगळया नावांनी आपण मेकॅनिक असल्याची नोंद करून अनेक जणांना फसविल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करुन त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी शिवडी पोलीस ठाणे येथे दि. १०.७.२०१४ रोजी आरोपी नामे झुबेर खान याचे विरुध्द गुन्हा नोंद क्र. ८२/२०१४, कलम ४०६, ४२० भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपीस दि.९.१.२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी सद्यस्थितीत जामिनावर असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(४) राज्यात पोलीस कार्यालयात सायबर गुन्हे रोखण्याकरिता सायबर सेल कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. सर्व पोलीस ठाण्यामध्ये नागरिकांच्या बैठका आयोजित करुन त्यांना सायबर गुन्ह्यांची माहिती समजावून सांगून त्यांच्यामध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागृकता निर्माण करण्यात आलेली आहे. क्रेडीट कार्ड व डेबीट कार्ड वापरतांना होणाऱ्या धोक्यांबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. इंटरनेट व फेसबुकचा वापर करीत असलेल्या मुलांवर लक्ष ठेवण्याबाबत सुचित करण्यात येते. राज्यातील सर्व सायबर कॅफेंना त्यांच्याकडे आलेल्या ग्राहकांचे ओळखपत्र, नाव, पत्ता अशा बाबींची माहिती संकलित करण्याबाबत बंधनकारक केले असून त्यांचे उल्लंघन करण्यावर वेळोवेळी योग्य ती कारवाई केली जाते. सायबर क्षेत्रातील विविध मान्यवर व तज्ञ यांना आमंत्रित करुन जनतेमध्ये सायबर विषयी जनजागृती करण्यात आली आहे. वृत्तपत्र, शाळा कॉलेजमध्ये तसेच हौसिंग सोसायटयांमध्ये सेमिनार आयोजित करुन लोकांमध्ये यासंबंधी जनजागृती करण्यात येत आहे.

दि. १३.०२.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण बघता त्यांवर आळा घालण्यासाठी सायबर क्राईम विंग तयार करणे, तसेच त्याकरिता निवडलेल्या १००० अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, पोलीसांच्या प्रशिक्षणात सायबर प्रशिक्षण असे एक महिन्याचे विशेष प्रशिक्षण सुरु करणे, तसेच सायबर क्राईमच्या अनुषंगाने आवश्यक त्या विशेष तांत्रिक प्रशिक्षणाकरिता तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे, माहिती तंत्रज्ञान केंद्र स्थापन करणे, माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ७८ मध्ये दुरुस्ती करणे, सदरहू गुन्ह्यांचा निकाल त्वरीत लागावा ह्याकरिता जलद न्यायालय स्थापन करणे, जनजागृतीचे कार्यक्रम राबविणे, CERT (Computer Emergency Response Team) च्या स्थापनेसाठी केंद्र शासनास केलेल्या विनंतीचा पाठपुरावा करणे, तसेच ह्या सर्व बाबींसाठी आवश्यक त्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे या बाबींवर चर्चा करण्यात आली असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरच्या बैठकीच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंधेरी (मुंबई) येथील कूपर आणि कामगार हॉस्पिटलमधून टिबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मिळत नसल्याबाबत**

**(३) * ३८१२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी येथील कूपर आणि कामगार रुग्णालयामधून टीबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर दोन्ही रुग्णालयांमधून पूर्णक्षमतेने उपचार मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कूपर रुग्णालयासंदर्भात हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कूपर रुग्णालयातून टी.बी. (क्षयरोग) च्या रुग्णांना पूर्ण क्षमतेने उपचार मिळण्याची व्यवस्था उपलब्ध आहे. अंधेरी येथील कामगार रुग्णालय राज्य शासनाच्या अखत्यारीत नसून ते केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारीत असून त्यावर राज्य कारभार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांचे नियंत्रण आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाने आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांना दिल्या आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या ३४ गावांचा महापालिकेत समावेश करण्याबाबत**

**(४) * ३२८५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या ३४ गावांचा महानगरपालिकेत लवकरच समावेश केला जाणार असुन त्यांचा पायाभूत विकास करण्यासाठी किमान एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे परंतु याकरिता तीन हजार कोटी रुपये आवश्यक असल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांचा मुलभूत विकास करण्यासाठी राज्य शासनाने काही ठोस पावले उचलली आहेत काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदरचा तपशिल उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिका हद्दीलगतची ३४ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करणेबाबत शासनाने दिनांक २९.५.२०१३ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्यानुसार प्राप्त हरकती व सूचनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्यासमोर झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने प्राप्त अहवाल तपासण्यात येत आहे. तसेच सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले असून, त्या विभागाचे अभिप्राय विचारात घेवून ३४ गावांच्या समावेशनाबाबत निर्णय घेण्यात येईल.

अधिसूचनेप्रमाणे गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत हद्दीत करावयाचा झाल्यास या भागातील पायाभूत सोयी सुविधाकरीता पुणे महानगरपालिकेने १००% अनुदानाची आवश्यकता कळविली आहे.

समावेशनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाची कामे जलद गतीने करण्याबाबत**

**(५) * ३४८४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा भरण्यासाठी कमी कालावधी शिल्लक राहिला असताना सर्वच कामे मंदगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांचे निर्देश डावलून सिंहस्थ कुंभमेळयामध्ये नाशिक शहरात कायमस्वरुपी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याऐवजी तात्पुरते सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळयाची कामे जलद गतीने होण्यासाठी तसेच नाशिक शहरात कायमस्वरूपी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबतचा आतापर्यंतचा अनुभव व सिंहस्थ कुंभमेळयाचा कालावधी विचारात घेता तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास गृह विभागाने त्यांच्या दिनांक ३/१२/२०१४ व दिनांक ०१/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(३) सिंहस्थ कुंभमेळयाचे आयोजन व अंमलबजावणी संदर्भात दिनांक २८/१२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती, मा.पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती, व जिल्हाधिकारी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

याशिवाय मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने वेळोवेळी घेतलेल्या व घेतल्या जाणाऱ्या निर्णयाची कालबध्द व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या हेतूने अपर मुख्य सचिव (सा.बां.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये कैंद्रीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने मान्यता दिलेल्या आराखडयातील कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असून, त्यानुसार कायमस्वरुपी कामे मार्च २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत असून, तात्पुरत्या स्वरुपातील कामे कामाच्या स्वरुपानुसार जून २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

सीसीटीव्हीच्या कामासंदर्भात गृह विभागाच्या दिनांक २०/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मे.प्राईसवॉटर कुपर यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतची निविदा प्रक्रिया पोलीस आयुक्त, नाशिक यांचे स्तरावर राबविण्यास मान्यता दिली आहे तसेच पोलीस आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली खरेदी व तांत्रिक समिती स्थापन करण्यासा मान्यता दिली आहे. गृह विभागाकडील दिनांक ३/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत ई-टेंडर दिनांक ११/०२/२०१५ रोजी प्रसिध्द केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विक्रोळी (पूर्व) येथील (मुंबई) हरियाली गावातील विकासकाने येथील डीपी रोड बंद केल्याने विद्यार्थी आणि रहिवाश्यांना मोठया प्रमाणात होत असलेला त्रास**

**(६) * ३५७८ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पूर्व) येथील (मुंबई) हरियाली गावातील एका विकासकाने येथील डीपी रोड बंद केल्याने येथील विद्यार्थी आणि रहिवाश्यांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रहदारीचा रस्ता बंद करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच,विद्यार्थी आणि रहिवाश्यांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर डीपी रोड पूर्ववत वाहतुकीसाठी सुरु  करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मौजे हरियाली येथील न.भू.क्र. २५२ ते २५५, २७६, २७७, २७९, २८२, २८४ व २८५ या क्षेत्रावर अभिन्यास मंजूर केलेला आहे. ज्या ठिकाणी विकास योजना रस्ता बंद करण्यात आलेला आहे ती जागा न.भू.क्र. २८३ पैकी असून ती मंजूर अभिन्यासाचा भाग नाही. सदर जागा खाजगी मालकीची असल्याने त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुरु केलेली आहे. सध्या अभिन्यासातील मोकळया जागेमधून विद्यार्थी ये-जा करीत आहेत. विकास योजना रस्त्याखालील न.भू.क्र. २८३ पैकी खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करणेबाबात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात येत आहेत.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेने स्थानिक स्वराज्य संस्था कर (एलबीटी) वसुल करण्यासाठी सल्लागार नेमल्याबाबत**

**(७) * ३५२५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने सन २०१४ मध्ये स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसूल करणे व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासंदर्भात सल्ला देण्यासाठी २५ सल्लागारांची नेमणूक केली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सल्लागारांच्या नियुक्तीसाठी रक्कम रुपये २ कोटीचा खर्च महानगरपालिकेला करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बेताचीच असल्याने महानगरपालिकेने सदरचा २ कोटीचा खर्च करणे, आर्थिकदृष्ट्या कितपत संयुक्तिक आहे, तसेच प्रकरणाधिन सल्लागारांचे नियुक्तीनंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात किती वाढ झाली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम २९ मधील तरतूदीप्रमाणे नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी नमुना E II मध्ये दाखल केलेल्या विवरणपत्रांची नियम ३३ मधील तरतूदीप्रमाणे छाननी करणे अपेक्षित आहे. तथापि, या कामाकरीता महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना, पुर्वानुभव नसल्याने अशा विवरणपत्रांच्या छाननीच्या कामात या विषयामधील तज्ञ व्यक्तींचा सल्ला आवश्यक वाटल्याने, विवरणपत्रांच्या छाननीत व करनिर्धारणेत महापालिकेच्या महसूलाची कोणत्याही स्वरुपात संभाव्य हानी होऊ नये, या उद्देशाने अशा सल्लागार नियुक्तीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने अंमलात आणणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापि अद्याप पर्यंत अशा सल्लागारांची नियुक्तीचे आदेश बजाविण्यांत आलेले नाहीत.

(२) महापालिकेकडे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील एकूण ११३८० विवरणपत्रे आजपर्यंत प्राप्त झालेली असून अशा विवरणपत्रांची छाननी व करनिर्धारणा करणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील प्राप्त झालेले व २०१४-१५ आर्थिक वर्षातील प्राप्त होणाऱ्या विवरणपत्रांच्या छाननीच्या कामासाठी अंदाजीत रक्कम म्हणून रुपये २ कोटीच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

(३) स्थानिक संस्था कर नियम २०१० नियम २९ मधील तरतूदीप्रमाणे प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची, नियम ३३ मधील तरतुदीप्रमाणे छाननी करुन करनिर्धारणा करणे आवश्यक असल्याने तसेच अशा छाननीमधून महापालिकेच्या महसूलाची संभाव्य हानी होऊ नये या करीता सदरचा खर्च अनिवार्य आहे.

-----------------

**अकोला महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर अनुकंपा तत्वावरील उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत**

**(८) * २९३२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर प्रलंबित असलेल्या ३९ अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीच्या पदभरतीबाबत सातत्याने संबंधितांना पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दिनांक २२ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयात दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंतच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तींच्या प्रतिक्षा यादीत असलेल्या उमेदवारांसाठी सदर निर्बंध या शासन निर्णयाच्या दिनांकापासून शिथिल करण्यात येत आहेत असे नमूद असतांनाही अमरावती महानगरपालिकेमध्ये अनुकंपा तत्वावर भरती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती महानगरपालिकेमध्ये अनुकंपा तत्वावर करण्यात आलेल्या भरतीच्याच धर्तीवर अकोला महानगरपालिकेच्या अनुकंपा तत्वावर भरती करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्यास महापालिका सक्षम आहे.

(३) होय. प्रस्तुत प्रकरणात अमरावती महानगरपालिका सक्षम असल्याने, अमरावती महानगरपालिकेने त्यांना असलेल्या अधिकारांतर्गत अशी पदभरती केल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणात महानगरपालिका सक्षम असून, संबंधीत महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर निर्णय घेणे अपेक्षीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील झरी-जामणी तालुक्यातील डोलोमाईट कंपन्यांच्या ब्लास्टिंगमुळे शेतपीकांचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान**

**(९) * ३४४४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील झरी-जामणी तालुक्यातील आडेगाव परिसरात आयुषी मिनरल्स, इशान गोल्ड आणि दिपाली गुंडावार माईन्स या तीन डोलोमाईट कंपन्या असून त्यांच्या ब्लास्टिंगमुळे शेतपीकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शेतपिकाचे नुकसान होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) आयुषी मिनरल्स यांना वितरक परवाना असुन अन्य दोन कंपन्या मे.ईशान गोल्ड व दिपाली गुंडावार यांना डोलोमाईट खनिजाचा खाणपट्टा मंजूर आहे. सदर खाणपट्ट्यातील ब्लास्टींगमुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याचे दिसुन आले आहे.

(२), (३) व (४) याबाबतचे शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार झरी-जामणी यांच्या निदेशानुसार तलाठी आडेगाव व कृषी सहाय्यक यांनी संयुक्त पाहणी केली असता ब्लास्टींगमुळे कंपनीच्या शेजारील शेतामध्ये अर्धा ते १ किलोग्रॅम वजनाचे दगड शेतामध्ये आढळून आले. तसेच पिकांच्या पानांवर धूळीचे थर आढळून आले. त्यानुषंगाने शेतपिकांचे नुकसान होऊ नये यासाठी तिन्ही कंपनी मालकास निदेश देण्यात आले आहेत.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचा विकास आराखड्यासाठी जनतेने दिलेल्या हरकतीची दखल घेण्याबाबत**

**(१०) * ३१९६ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचा विकास आराखडा ड्राफ्ट प्लॅन प्रसिध्द झाला आहे, या विकास आराखड्यास सुमारे ८७ हजार लोकांनी हरकती नोंदविल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या हरकतीची सुनावणी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखड्यास अंतिम मंजूरी देताना या हरकतीची दखल राज्य शासन घेणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बृहन्मुंबई क्षेत्राचा विकास आराखडा सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप सुधारित विकास आराखडा नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेला आहे. नागरिकांना सूचना हरकती सादर करण्यासाठी ६० दिवसांचा कालावधी आहे. सदर कालावधी दिनांक २५.४.२०१५ रोजी संपणार आहे. त्यानंतर किती सूचना/हरकती प्राप्त झाल्या याबाबत निश्चित संख्या देता येवू शकेल. प्राप्त सूचना/हरकत दाखल करणाऱ्यांना सुनावणी देवून तसेच इतर वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रारुप सुधारित विकास आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनास मंजूरीसाठी सादर होणार आहे.

प्रारुप सुधारित विकास आराखडा शासनास प्राप्त झालेनंतर प्राप्त सूचना/हरकती विचारात घेवून, सर्वकष विचार करुन गुणवत्तेनुसार प्रारुप सुधारित विकास आराखडयास मंजूरी देणेबाबत अंतिम निर्णय घेणेत येईल.

-----------------

**नाशिक येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करणेबाबत**

**(११) * २८१८ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४९१४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक व लगतच्या परिसराचा आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, वाणिज्य व व्यवसायिक अशा सर्वस्तरावरील वाढता विस्तार, लोकसंख्येचे प्रमाण तसेच नाशिकचे महत्व विचारात घेता कोल्हापूर, सोलापूर व पुणे येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करणेच्या मागणीचे अनुषंगाने नाशिक येथेही स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याची आवश्यकता शासनाचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयाची कोल्हापुर, सोलापूर, व पुणे येथे खंडपीठे स्थापन करण्याचा मागणीच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयातील तीन न्यायमुर्तीची समिती मा.मुख्य न्यायमुर्ती यांनी स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, तसेच नाशिक येथे मुंबई उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करणेबाबतच्या मागणीवर स्वतंत्रपणे विचार करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) कोणत्याही राज्यामध्ये उच्च न्यायालयाने नवीन खंडपीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ मधील तरतुदीनुसार उच्च न्यायालयाचे मा. मुख्य न्यायमूर्ती व मा. राज्यपाल यांनी मान्यता दिल्यानंतर केंद्रशासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो. त्या प्रस्तावास मा. राष्ट्रपती यांनी मान्यता दर्शविल्यास नवीन खंडपीठ स्थापन केले जाऊ शकते. मा. उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन व्हावे, अशी मागणी राज्यातील विविध भागांतून सातत्याने होत आहे. या मागणीच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयातील तीन न्यायमूर्तींची समिती मा.मुख्य न्यायमूर्ती यांनी स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे या मागणीवर स्वतंत्रपणे विचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी येथील कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयुट मध्ये २५ वर्षापासून सेवेत असणाऱ्या कामगारांना अचानक कामावरून कमी केले जात असल्याबाबत**

**(१२) * ३६२९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील कोहिनूर टेक्निकल इंस्टीट्युट मध्ये २५ वर्षापासून सेवेत असणाऱ्या कामगारांना कामगार कायद्याच्या कोणत्याही सुविधा न देता अचानक कामावरून कमी केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांनी याविरूध्द दिनांक २४ डिसेंबर, २०१४ व १२ जानेवारी, २०१५ रोजी काम बंद आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) भिवंडी येथील कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूट या आस्थापनेतील एका कामगारास दि. १५.१०.२०१४ रोजी त्यांचा व्यवस्थापनेबरोबर असणारा वैयक्तिक करार खंडीत करुन कामावरुन कमी करण्यात आले होते. तसेच आस्थापनेत कार्यरत असणा-या कामगारांस ओळखपत्रे, रजेचा पगार, बोनस, वेतनचिठ्ठी इत्यादी सुविधा दिल्या जात नव्हत्या हे खरे आहे.

(२) आस्थापनेतील कामगारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या श्रमजिवी वाराई माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना या संघटनेने ०८ कामगारांच्या विविध मागण्याकरीता व्यवस्थापनावर बजावलेल्या दिनांक २९/१०/२०१४ रोजीच्या मागणीपत्रास व्यवस्थापनाने सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने संघटनेने दिनांक २४/१२/२०१४ रोजी एक दिवसाचे धरणे आंदोलन व दिनांक १२/०१/२०१५ पासून काम बंद आंदोलन सुरु केले.

(३) होय.

(४) अ) आस्थापनेतून दिनांक १५/१०/२०१४ रोजी कामगारास कामावरुन कमी केल्याच्या प्रकरणी औद्योगिक संबंध यंत्रणेमार्फत मध्यस्थीने कामगारास दिनांक ०२/१२/२०१४ रोजी पुर्ववत कामावर घेण्यात आले.

ब) आस्थापनेचे दिनांक २९/१२/२०१४ व दिनांक ०६/०१/२०१५ रोजी अंमलबजावणी यंत्रणेमार्फत निरिक्षण करण्यात येवून आढळलेल्या त्रुटींची (ओळखपत्र, रजेचा पगार, वेतनचिठ्ठी, बोनस) पुर्तता करण्याचे निर्देश आस्थापनेस देण्यात आले. व्यवस्थापनेने कामगारास ओळखपत्रे जारी करुन कर्मचा-यांना रजेचा पगार अदा केला.

क) दरम्यानच्या कालावधीत औद्योगिक संबंध यंत्रणेमार्फत उभयपक्षांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. बैठकांप्रसंगी संघटना / कामगारांतर्फे कायदेशीर देय रक्कमांची मागणी करण्यात आली व त्यानुसार उभयपक्षात समझोता होवून कामगारांस कायेदशीर देय रक्कमा अदा करण्यात येवून कामगारांनी राजीनामा दिला आहे अशा प्रकारे विवाद संपुष्टात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोळसा उत्पादनात केंद्र सरकारला प्राप्त होणाऱ्या उत्पनातून खाण परिसरातील विकासकामासाठी पुरेसा निधी मिळत नसल्याबाबत**

**(१३) * ३९८३ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळसा उत्पादनामुळे जो महसुल केंद्र शासनाला मिळतो त्यातील काही निधी हा संबंधित विभागाच्या विकासकामासाठी राज्य शासनाला खनिज निधी म्हणून मिळतो, या निधितून खाणीच्या परिसरात विकासकामे होणे अपेक्षित असते परंतु वणी (जि.यवतमाळ) येथील खाण परिसरातील विकासकामासाठी हा निधी पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाणीच्या भागात येणा-या लहान गावाच्या परिसरात कोळसा खाणीतून निघालेली माती टाकण्यात येते यामुळे या भागात मातीचे ढिगारे तयार झाले असून त्याचा तेथील रहिवाश्यांना त्रास होतो तसेच चार वर्षापूर्वी काही गावांजवळ असलेल्या या टेकड्या खचल्याने गावकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) राज्यात उत्पादन होणाऱ्या खनिजाच्या स्वामित्वधनापैकी १० टक्के रक्कम राज्य खनिज विकास निधी मध्ये जमा करण्यात येते खनिज विकास निधी अंतर्गत सन २००० पासून यवतमाळ जिल्ह्यातील एकूण रुपये ९३१९.७५ लक्ष रकमेच्या ४५२ कामांना मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामध्ये कोळसा क्षेत्रातील वणी, झरीजामणी, मारेगाव तालुक्यातील रुपये ६३६०.३२ लक्ष रकमेच्या १०२ कामांचा समावेश आहे.

(२) वणी तालुक्यामध्ये वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेडच्या ५ खुल्या कोळसा खाणी असून यामधून निघणारे ओव्हर बर्डन खाणींच्या सिमेमध्येच टाकले जाते. दिनांक ०४.११.२००९ रोजी पिंपळगाव येथील खुल्या कोळसा खाणीतील ओव्हर बर्डन अस्थिर होऊन खचली होती. त्यामुळे विद्युत वाहिनीचे २ टॉवर वाकले होते. परंतू कोणतीही जिवीत हानी अथवा ग्रामस्थांच्या मालमतेचे नुकसान झाले नव्हते.

(३) व (४) तज्ञांच्या सूचनेनुसार मौजे बोरगाव येथील काही सार्वजनिक सुविधा ज्या डम्पींग क्षेत्रापासून ७० मिटरच्या अंतरावर आहेत त्यांचे पुर्ननिर्माण वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड यांचेकडून करण्यात आलेले आहे.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे मलनि:स्सारण केंद्र चालविणाऱ्या कंपनीला वर्क ऑर्डर देण्याबाबत**

**(१४) * ३७०८ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे तीन महिने होऊन देखील मलनि:स्सारण केंद्र चालविणाऱ्या ठेकेदार कंपनीला वर्क ऑर्डर न दिल्याने दिनांक १५ जानेवारी, २०१५ पासून भुयारी गटार योजनेचे काम बंद केल्याने मलनि:स्सारण केंद्रातील ड्रेनेजमधील मैलामिश्रित पाणी नदीत वाहून शहरातील नागरीकांसह, नदीकाठच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नुसार पंढरपूर येथील भुयारी गटार योजनेचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

तथापि, भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ अंतर्गत पंपगृह बांधणीसाठी मक्तेदार यांनी जागा खरेदी करुन त्याठिकाणी या योजनेअंतर्गत पंपगृह बांधले आहे. मक्तेदारांना या जागेच्या मोबदल्यात कोणताही मोबदला न मिळाल्याने त्यानी दि. १७/१/२०१५ रोजी व त्या दरम्यान मलशुध्दीकरण पंपगृह बंद ठेवले होते.

गोपाळपूर येथील मलशुध्दीकरण केंद्राची क्षमता १५.५० एम.एल.डी. असल्याने पंपगृहात साठलेले पाणी वेळोवेळी पंपिंग करुन मलशुध्दीकरण केंद्रात साठवून ठेवले होते. त्यानंतर तात्काळ मलशुध्दीकरण केंद्र पुर्ववत चालू करुन साठवून ठेवलेल्या पाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया करुन ते पाणी मलनिस्सारण केंद्रातून गोपाळपूर येथील नाल्यात सोडण्यात येवून त्यातील ६० ते ७० टक्के पाणी शेतकरी शेतीकरीता उचलत असतात व उर्वरीत पाणी नाल्यामधून वाहून जाते. सदर पाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया केल्याने गावातील व नदीकाठच्या नागरिकाचे आरोग्य धोक्यात आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) पंढरपूर येथील भुयारी गटार योजनेचे काम केंद्र शासनाच्या यु.आयडी. एस.एस.आय.एमटी या योजनेतून १५.५० एम.एल.डी. क्षमतेच्या मलनिस्सारण केंद्राचे काम पूर्ण करण्यात आले असून हे केंद्र कार्यान्वीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये ३६०० झाडे धोकादायक असल्याबाबत

**(१५) * ४११८ श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये महानगरपालिकेने गेल्या ९ महिन्यात १० लाख वृक्षांची गणना केली त्यापैकी ३६०० झाडे ही धोकादायक असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने मुंबईतील झाडांची जोपासणा तसेच नवीन वैशिष्ट्यपूर्ण झाडांची लागवड करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गेल्या ९ महिन्यांत व जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत १२,१२,३४७ इतक्या वृक्षांची गणना पूर्ण झाली असून त्यापैकी २६२ झाडे धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि धोकादायक झाडांबाबत महानगरपालिकेमार्फत वेळोवळी पहाणी करुन असंतुलीत व धोकादायक झाडांची शास्त्रोक्त पध्दतीने छाटणी करुन झाडे संतुलीत करण्यात येतात.

(३) पर्यावरणाचा समातोल राखण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी वृक्षांची लागवड करण्यात येते व त्यांची जोपासना केली जाते. तसेच पावसाळयामध्ये महानगरपालिकेमार्फत रस्त्यांवर, मोकळया आवारात, शैक्षणिक संस्था, औद्योगिक संस्था, उद्याने व इतर मोकळया जागांवर वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेतले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेची तिकिट दरवाढ कमी करण्याबाबत**

**(१६) * ३०१२ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचे तिकिट दर जास्त असून प्रवाशांना समाधानकारक सेवा मिळत नसल्याने तिकिट दर वाढ त्वरीत कमी करण्यात यावी असे निर्देश महापौर यांनी प्रशासनाला दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या तिकिट दरवाढीबाबत महानगरपालिकेच्या प्रस्तावास मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दिलेल्या मंजूरीनुसार दि.०१/११/२०१४ पासून तिकिट दरवाढ लागू करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने सदर तिकिट दरवाढ रद्द करण्याबाबत दि. २५/११/२०१४ रोजी ठराव पारित केला आहे.

महानगरपालिकेच्या महासभेने पारित केलेला उक्त ठराव मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने पालिका प्रशासनाने सदर ठराव विखंडीत करण्याबाबत शासनास प्रस्तावित केले आहे. महानगरपालिकेच्या सदर प्रस्तावाची शासनाकडून छाननी करण्यात येत आहे.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे मद्य विक्रेते व सराफाकडे थकीत असलेला जकात कर वसूल करण्याबाबत**

**(१७) * ३५१६ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे मद्य विक्रेते व सराफाकडून रुपये ६८५ कोटीचा जकात कर वसूल केला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मोठया प्रमाणात मद्य विक्रेते, सराफ व्यापाऱ्यांकडे थकीत असणाऱ्या कर वसुलीबाबत महापालिकेकडून दिरंगाईबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. २६५८०/१४ मध्ये मद्य विक्रेते व सराफ यांच्याकडून जकात कर वसूल केला नसल्याबाबत नमुद केले आहे. तसेच स्थानिक दैनिकांमध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.

(२) व (३) मद्य विक्रेत्यांना नोटीस देऊन जकात कर भरल्याबाबतचे दप्तराची मागणी करुन आतापर्यंत रुपये ९.१० कोटी व सराफाकडून रुपये २६ लक्ष इतक्या रकमेची वसूली केलेली आहे.

-----------------

**महाराष्ट्र आरक्षण कायदा २००१ हा कायदा मॅट न्यायालयाने घटनाबाह्य असल्याचा निर्णय दिल्याबाबत**

**(१८) * ३३३५ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरक्षण कायदा २००१ हा कायदा मॅट न्यायालयाने घटनाबाह्य असल्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्तांना या कायद्याचा फार मोठा दुष्परिणाम होणार आहे हे खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणी शासन भटक्या विमुक्तांना न्याय देण्याबाबत काय कार्यवाही करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा (MAT) ने दि. २८.११.२०१४ रोजी महाराष्ट्र आरक्षण कायदा २००१ हा कायदा घटनाबाह्य असल्याचा निर्णय दिला आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्यांच्या दि. २८.११.२०१४ रोजीच्या स्वतःच्या आदेशास पुढील १ वर्षाकरिता स्थगिती दिली असल्याने सद्यःस्थितीत आरक्षण कायदा-२००१ तसेच शासन निर्णय दि. २५.५.२००४ ची अंमलबजावणी पुर्वीप्रमाणेच सुरु आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या दि. २८.११.२०१४ रोजीच्या निर्णया विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि. १३ मार्च, २०१५ रोजी अपिल दाखल करण्यात आले असून. सदर अपिलास रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ७२५६/२०१५ असा दिला होता. सदर प्रकरणी दि. २०.३.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीच्या वेळी सदर याचिकेस रिट याचिका क्र. २७९७/२०१५ असा दिलेला आहे. त्यावेळी मा.उच्च न्यायालयाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दि. २८.११.२०१४ च्या आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.४.२०१५ रोजी ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वाहन पार्किंगसाठी वाहनतळ उभारण्याबाबत**

**(१९) * २७३१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) आर.टी.ओ. क्षेत्रात वाहनांची संख्या दिवसेदिवस वाढत असल्याने व वाढणारी वाहने उभी करण्यासाठी कल्याण-डोबिंवलीत पुरेसे वाहनतळ नसल्याने शहरातील पार्किंगची समस्या वाहतूकीस कारणीभूत ठरत आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण आर.टी.ओ. कार्यालयाच्या आकडेवारीनुसार प्रतिवर्षी सुमारे ३३ हजार वाहनांची नव्याने भर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पार्किंगची पुरेशी व्यवस्था नसल्या कारणाने कल्याण शहराच्या रस्त्यांवर दुतर्फा वाहने पार्किंग केली जात असल्यामुळे शहराच्या वाहतूक कोंडीवर प्रचंड ताण येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाहनांची वाढती संख्या पाहता पार्किंगसाठी शहरात वाहनतळ उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) कल्याण -डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरीता मंजूर विकास योजनेमध्ये ५७ आरक्षणे वाहनतळाकरीता प्रस्तावित असून त्यापैकी १० ठिकाणी महानगरपालिकेकडून वाहनतळांचा विकास करण्यात आला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वाहनकोंडी समस्येचे निराकरण करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत पार्कींग पॉलिसी प्रस्तावित आहे.

उक्त मंजूर विकास योजनेतील बाह्यवळण रस्ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून विकसित करण्याचे पालिकेकडून प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबत

**(२०) * ४१८२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पत्रकारांना राज्य सरकारतर्फे निवृत्तीवेतन देण्याची योजना सुरु करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेऊन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याच्या दृष्टीने विविध पर्यायांची पडताळणी करण्यात येत आहे.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) येथील मोतीलाल नगरच्या प्रलंबित पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(२१) * ४२२७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील मोतीलाल नगरच्या पुनर्विकास प्रक्रियेला १ वर्षाचा कालावधी होवूनही जमीन नियोजन आराखडा व इतर आवश्यक कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची अपूर्ण कामे पूर्ण करुन उक्त प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरणाकडून प्राप्त अहवालानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका क्र. ५८/२०१२ व ८७/२०१३ मध्ये मोतीलाल नगर, १, २ व ३ चा पुनर्विकास सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) नुसार म्हाडाकडून करण्यांत येईल, असे म्हाडाच्या वतीने सांगण्यांत आल्यानंतर याअनुषंगाने म्हाडाने पुढील आवश्यक कार्यवाही सुरु करावी, असे मा.उच्च न्यायालयाने दि. १७.१०.२०१३ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. त्यानुसार म्हाडाने सदर पुनर्विकास कसा करण्यांत येईल, याबाबत सविस्तर शपथपत्र दि. १४ जानेवारी, २०१५ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयात सादर केले आहे. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मोतीलाल नगर १, २ व ३ च्या पुनर्विकासाकरिता जमिन वापराचा नियोजन आराखडा म्हाडाकडून तयार करुन घेण्यात आला असून प्रकल्प सल्लागाराच्या नेमणुकीसाठी निविदा मसुदा म्हाडाकडून मंजुर झाला आहे व लवकरच निविदा प्रसिध्द करण्यात येत आहेत व त्यानंतर अनुषंगिक कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विरार-बोळींज (ता.वसई) येथील अर्जदारांना मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत भूखंडाचा ताबा देण्यास टाळाटाळ होत असल्याबाबत**

**(२२) * ४२८७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-बोळींज (ता.वसई) येथील मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत सन २००४ मधील सोडतीत यशस्वी ठरलेल्या कोड क्र.२२१ मधील अर्जदारांना भूखंडांचा ताबा देण्यास हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केली जात आहे, असे संबंधित अर्जदारांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.सभापती, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना निवेदन देऊन त्यांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करून संबंधित अर्जदारांना भूखंडांचा ताबा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, अर्जदाराचे निवेदन प्राप्त झाले असले तरी अर्जदाराने अर्जात नमूद केलेली वस्तुस्थिती खरी नाही.

(२) व (३) विरार- बोळींज येथील अभिन्यासात सुधारणा करुन आवश्यक असलेले ४३ अतिरिक्त भूखंड दर्शवून अभिन्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे मंजूरीकरीता सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अभिन्यासास सुधारीत मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तसेच लाभार्थ्यांनी नियमानुसार आवश्यक अधिमूल्याचा भरणा कोकण मंडळाकडे केल्यानंतर भूखंड वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथील “आमंत्रण” या बांधकाम विकासकाने स्वस्त घरांचे आमिष दाखवून नागरिकांची केलेली फसवणूक**

**(२३) * ४४६४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेतील ओक बाग येथील सिध्दिविनायक व्यापारी संकुलात “आमंत्रण” या बांधकाम विकासकाचे कार्यालय असून त्याने नेवाळी परिसरात स्वस्त घरांचे आमिष दाखवून येथील नागरिकांची फसवणूक केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विकासकाने फसवणूक केलेला या वर्षातील हा ११ वा प्रकार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, वारंवार फसवणूक करणा-या सदरील विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

उक्त प्रकरणी विकासकाने फसवणूक केलेल्या या वर्षातील हा ११ वा प्रकार असल्याचे निदर्शनास आले हे खरे नाही. आमंत्रण बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स या विकासकावर वरीलप्रमाणे एक गुन्हा दाखल आहे.
(३) व (४) ठाणे पोलीस आयुक्तालयातील कल्याण येथे आमंत्रण बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स कार्यालयाचे मालक यांनी फिर्यादीकडून बुकींगसाठी चेकव्दारे व रोख रक्कम अशी एकूण ५७,३४,७८३/- रुपये पैसे घेवून येथे घर देतो असे सांगून घराचा ताबा न देता व बुकींगचे पैसे परत न देता आपसांत संगनमत करुन फसवणूक केलेबाबत महात्मा फुले पोलीस स्टेशन गुरक्र. ९५५/१४ भादंविसं कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दिनांक २५.१२.२०१४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर प्रकरणी एक आरोपीस अटक करण्यात आलेली असून ५ पाहिजे आरोपी अटक करणेवर सदरचा गुन्हा तपासाधीन आहे. या प्रकरणी अपहारित मालापैकी रुपये १,०३,०००/- रोख रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील खाडीमधील गाळ काढणेबाबत**

**(२४) * ४५२४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील खाडीमध्ये गाळ साचल्याने परिसरातील मच्छिमार संस्थांनी गाळ काढणेबाबत निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मासेमारी करत असताना यांत्रिकी बोटीचे नुकसान होऊ नये याबाबत दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी वा त्यासुमारास ४०० ते ५०० यांत्रिकी बोटधारक मच्छिमारानी स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत गाळ काढणेबाबत कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खाडीतील गाळ काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मच्छिमार संस्थांकडून सदर खाडीमध्ये साचलेला गाळ काढणेबाबत निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोईसर-आलेवाडी (जि.पालघर) गावात आलेवाडी ग्रामपंचायत कार्यालयाचा स्लॅब कोसळून झालेला मृत्यू**

**(२५) * ४६३७ श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर-आलेवाडी (जि.पालघर) गावात आलेवाडी ग्रामपंचायत कार्यालयाचा स्लॅब कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू व ७ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय. आलेवाडी ग्रामपंचायत कार्यालयाचा स्लॅब कोसळलेला नसून ग्रामपंचायत आलेवाडी यांचे ताब्यातील जुने पंप हाऊसचा स्लॅब कोसळलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी केलेली असून, सदर आठही व्यक्ती दिनांक २८.०१.२०१५ रोजी सदरच्या स्लॅबवर बसलेले असताना, स्लॅब कोसळून सात जण जखमी झालेले आहेत, तसेच एका व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे. सदर मृत्यूबाबत सागरी पोलीस स्टेशन, सातपाटी येथे अ.मृत्यू रजि.नं.०५/१५ सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे दाखल असून सदर अ.मृत्यूची चौकशी चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने सुधारित मालमत्ता करात वाढ करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२६) * ४६८१ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने सुधारित मालमत्ता करात माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चटई क्षेत्रफळावर (कारपेट) स्टॅम्प डयुटीच्या रेडिरेकनर दरानुसार कराची आकारणी करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिका चटई क्षेत्रानुसार (कारपेट) कर आकारणी न घेता बिल्ट अपनुसार कर आकारित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मुंबई महानगरपालिकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुधारीत मालमत्ता करात माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान वाढ करण्याचा निर्णय घेतलेला नाही. परंतु, दिनांक ३१.०३.२०१५ रोजी भांडवली मूल्याधारित करप्रणालीच्या अंमलबजावणीस ५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत असून बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १५४ (१क) मधील तरतुदीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील जमिनी व इमारतीचे दिनांक ०१.०४.२०१५ पासून भांडवली मूल्य सुधारणे बंधनकारक आहे. त्यानुसार दि. ०१.०४.२०१५ पासून सुधारणा करण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(२) मा. उच्च न्यायानलयाने रिट याचिका क्रमांक १८१२/२०१३ मध्ये दिनांक २ मे, २०१४ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, मालमत्ता कर हा चटई क्षेत्रावर आकारला जावा अशी तरतूद असल्याने भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या नियमामध्ये सुधारणा करण्याबाबत विचार करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) दिनांक ०१.०४.२०१० पासून भांडवली मूल्याचे परिगणन बिल्टअप नुसार करण्यात आले आहे हे खरे आहे. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.०४.२०१५ पासून मालमत्ता कर हा चटईक्षेत्रावर आकारला जाणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील निवासी इमारतीमध्ये वर्षोनुवर्षे वैद्यकीय व्यवसाय करणा-या हॉस्पिटलला शासनाच्या नियमावलीतून सूट देण्याबाबत**

**(२७) * ५०८१ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील निवासी इमारतीमध्ये वर्षोनुवर्षे वैद्यकीय व्यवसाय करणा-या हॉस्पिटलला शासनाच्या नियमावलीतून सूट देण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे ही बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हॉस्पिटले सुरु करण्यास किती कालावधीत परवानगी देण्यात येणार आहे,
(३) तसेच शहरातील गरीब जनतेला तात्काळ सेवा मिळावी म्हणून सदर हॉस्पिटल सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.
पुणे महानगरपालिका स्तरावर निवासी वापराचे इमारतीमध्ये नर्सिंग होम, मॅटर्निटी होमचा वापर अनुज्ञेय करण्याबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करुन सवलत देणेकरिता कलम ३७ अन्वयेच्या प्रस्तावासंदर्भात प्राथमिक ठराव क्र. ७१५, दि. २४/०१/२०१४ रोजी करण्यात आलेला असून त्यापुढील कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे. अद्याप अशी कार्यवाही पूर्ण करुन परिपूर्ण प्रस्ताव महानगरपालिकेकडून शासनास सादर झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भात ट्रक, ट्रॅव्हलस,स्कूल बस इत्यादी प्रकारच्या वाहनांची तस्करी होत असल्याबाबत**

**(२८) * ५१६४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथे बनावट क्रमांकाची नंबर प्लेट लावलेली बालाजी ट्रॅव्हलसची स्कुल बस क्र.एम.एच-३५ के-३८६६ पोलिसांनी जप्त केल्याची घटना दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात ट्रक, ट्रॅव्हल्स, स्कूल बस इत्यादी प्रकारच्या वाहनांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार आतापर्यंत किती गुन्हेगारांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विदर्भात ट्रक, ट्रॅव्हल्स इत्यादी प्रकारच्या वाहनांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) चंद्रपूर येथे स्कुल बसच्या बनावट नंबर प्लेट प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासामध्ये बनावट वाहन क्रमांकाचा दुरुपयोग करुन शासनाचा महसूल चुकवून फसवणूक केल्याबद्दल स्कूल बस मालिकाविरुध्द बल्लारशहा पोलीस ठाणे येथे अपराध क्र. २९/२०१५ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच स्कूल बस मालकास अटक केली असून गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) मधील धसई येथे बेकायदेशीर दारु विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२९) * ५१८५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील धसई येथे बेकायदेशीर दारु विक्री करणा-यांविरोधात तेथील बचत गटाच्या आठ महिलांकडून तक्रार दाखल करण्यात येवूनही कोणतीही कारवाई पोलिसांकडून केली गेली नसल्यामुळे उक्त बचत गटाच्या महिलांना दारु विक्रेत्याने घरात बंद करुन मारहाण केल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची तक्रार बचत गटाच्या सदस्या रंजना पारधी यांनी शहापूर पोलीस ठाण्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर बचत गटाच्या सदस्या रंजना पारधी यांनी दिनांक २७.०१.२०१५ रोजी शहापुर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरुन शहापुर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं.२९/२०१५ भादंविसं कलम ३४२, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपींना दिनांक २८.०१.२०१५ रोजी अटक करुन त्यांच्या विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केलेले असुन सदर गुन्हा हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या वरळी येथील कॅम्पाकोला इमारतीमधील तसेच राज्यातील इतर शहरांमधील सदनिका धारकांचे बांधकाम नियमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही**

**(३०) * ५२०९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या वरळी येथील कॅम्पाकोला इमारतीमधील सदनिका धारकांचे कायद्याच्या तरतुदी अंतर्गत व प्रचलित चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत जे बांधकाम नियमित करणे शासनाला शक्य आहे ते नियमित करुन घेण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने अनुमती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या निर्देशानुसार व प्रचलित कायद्याच्या व अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधकाम नियमित करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्देशांच्याआधारे मुंबई व राज्यातील इतर शहरांमधील याप्रकारे फसवणूक झालेल्या सदनिकाधारकांना दिलासा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वरळी येथील कॅम्पोकोला इमारतीतील सदनिका धारकांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २७/०२/२०१३ व दि. ०१/१०/२०१३ रोजीच्या आदेशांचे स्पष्टीकरण होण्यासाठी याचिका दाखल केली होती. त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ३०/०१/२०१५ च्या आदेशान्वये असे स्पष्टीकरण दिलेले आहे. की, याचिकाकर्ते यांनी राज्य शासनाकडे यासंबंधी निवेदन दिल्यावर राज्य शासन त्यावर नियमाचे तरतुदीनुसार आदेश पारित करु शकेल.

(२) यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थेचे दिनांक ३०/०१/२०१५ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले असून त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे आदेश विचारात घेवून नियमानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

(३) यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ अंतर्गत तरतुदी सध्या प्रस्तावित आहेत.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयातील रस्त्याचे निकृष्ट काम करणा-या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत**

**(३१) * ५४४८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील कामगार चौक ते महालक्ष्मी चौक आणि एसटी मार्गे जाणा-या सोहम मोटर्स रस्त्याचे निकृष्ट काम करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे निकृष्ट काम करणा-या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह व राज्याच्या विविध ठिकाणी सुरू असलेले खाजगी झटपट लॉटरी केंद्रे बंद करण्याबाबत

**(३२) * ५५०१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी सुरभी भिमा, गोल्ड मिनी, मुंबई लक्ष्मी अशा विविध नावाने मोठ्या प्रमाणावर खाजगी लॉटरी केंद्रे सुरू असल्यामुळे शासनाचा मोठा महसुल बुडत असून अनेक नागरिकांचे या झटपट लॉटरीमुळे संसार उध्वस्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई व राज्याच्या विविध ठिकाणी सुरु असलेली खाजगी झटपट लॉटरी केंद्रे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई शहर वगळता राज्यात कोठेही झटपट लॉटरी केंद्रे संदर्भात गुन्हे दाखल नाहीत.

मुंबई शहरात सन २०१२ ते सन फेब्रुवारी २०१५ पर्यंत झटपट लॉटरी केंद्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | कारवाईची संख्या | अटक आरोपी | जप्त रक्कम |
|---|---|---|---|
| सन २०१२ | ०७ | १२८ | रु. ६,१३,१९४ /- |
| सन २०१३ | २२ | १९३ | रु. ३,८४,६५० /- |
| सन २०१४ | ७५ | १७२ | रु. ४,०५,७९० /- |
| सन २०१५ | १० | २५ | रु. ३६,२४० /- |
| एकूण | ११४ | ५१८ | रु. १४,३९,८७४ /- |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बृहन्मुंबईत सन २००० नंतरच्या झोपड्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांना भाडेपटटयाने घरे देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(३३) * ५५५१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबईत सन २००० नंतरच्या झोपड्यामध्ये वास्तव्य करणा-या नागरिकांना १५ वर्षाच्या भाडेपटटयाने घरे देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) अद्याप, या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) शासनाने बृहन्मुंबईत सन २००० नंतरच्या झोपड्यांमध्ये वास्तव्य करणा-या नागरिकांना १५ वर्षाच्या भाडेपट्टयाने घरे देण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मागास प्रवर्गात येणाऱ्या उमेदवारांनी पात्रता निकषात तसेच परिक्षा शुल्कात सवलत घेतल्यास अमागास प्रवर्गातील पदावर शिफारस न करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३४) * ५६०३ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गास देय असलेली वय, परिक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी निकषा संदर्भातील सवलत उमेदवारांनी घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास प्रवर्गातील पदावर शिफारस करता येणार नाही असा निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय घटनाबाहय असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाबाबत पुनर्विचार करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अशी घोषणा दिनांक १९.९.२०१४ रोजी केली आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निर्णयाच्या अनुषंगाने याबाबतीतील केंद्र शासनाचे धोरण, केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून अवलंबिली जाणारी कार्यपध्दती याचा सर्वंकष विचार करुन यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## मुंबईत नवीन कारागृह बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही

**(३५) * ५७७० श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व परिसरातील कारागृहांची स्थिती लक्षात घेता कैद्यांची संख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत नवीन कारागृह बांधण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) मुंबई मध्यवर्ती कारागृहातील क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांची संख्या विचारात घेऊन, मुंबईच्या परिसरात ५००० बंदी क्षमतेचे अतिरिक्त कारागृह बांधता यावे याकरिता सामाजिक वनीकरण विभागाची मुलुंड पश्चिम, ता.चेंबुर, गाव मंडाले येथील सिटी सर्व्हे क्र. ०६ (६/१३अ) मधील ५४ एकर भुखंड कारागृह विभागास उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव महसुल व वन विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमळनेर शहराकरिता स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजूर करणेबाबत

**(३६) * ६०६२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर शहराकरिता स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस स्टेशन त्वरित कार्यान्वीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर बाबत महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या ६१४९४ नवनिर्मित पदांच्या पुढील टप्प्यात अंमळनेर शहराकरिता स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजुर करण्याचे शासनाचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याबाबत

**(३७) * ६१४२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने एक वर्षापूर्वी ७० कोटी रस्त्याची कामे करण्याची घोषणा करुन आतापर्यंत केवळ १२ कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ब-याच ठेकेदारांची कामाची बिले न दिल्याने ठेकेदारांनी कामे अर्धवट सोडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार औरंगाबाद शहरातील सर्वच मंजूर रस्त्यांची कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे. मागील वर्षी महानगरपालिकेतर्फे एकूण रु. ४४.७८ कोटींच्या रस्त्यांची कामाची घोषणा केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) एकूण रु. ४४.७८ कोटींच्या रस्त्यांच्या कामापैकी रु. १६.०० कोटींची कामे पूर्ण झाली आहेत व रु. २८.७८ कोटींची कामे प्रलंबित आहेत. निधीच्या उपलब्धते प्रमाणे उर्वरीत कामे पूर्ण करण्याचे योजीले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कॉ.गोविंद पानसरे यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांच्या अटकेबाबत**

**(३८) * ६२८१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉ.गोविंद पानसरे यांच्यावर दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूर येथे गोळ्या झाडून हल्ला करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉ.गोविंद पानसरे यांच्या हल्ल्याच्या निषेधार्थ आणि हल्लेखोरांना तात्काळ अटक होवून त्यांना शिक्षा मिळावी या मागणीसाठी राज्यभर आंदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॉ.गोविंद पानसरे यांच्या हल्लेखोरांचा तपास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, हल्लेखोरांच्या तपासात होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी राजारामपुरी पोलीस ठाणे येथे दि. १६.२.२०१५ रोजी गुन्हा नोंद क्र. ३९/२०१५ भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३०७, ३४ सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ प्रमाणे दि. १६.२.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत पुढील सूचना दिल्या. दहशतवाद विरोधी पथक, पुणे व मुंबई यांनी घटनास्थळी भेट दिली असून त्यांची तपासकामी मदत घेण्यात आली आहे. कॉ. गोविंद पानसरे यांच्या लिखाणाच्या संदर्भाने तसेच त्यांच्या विविध कार्यक्रमांच्या संदर्भाने निर्माण झालेल्या वादाबाबत गोपनीय व उघड तपास करण्यात आला. कर्नाटक व गोवा या शेजारील राज्यांच्या पोलीसांशी संपर्क साधून तपासासाठी मदत घेण्यात आली. विविध गुन्ह्यातील एकूण १७९ सराईत गुन्हेगारांकडे प्रत्यक्ष तपास करण्यात आला असून अधिक तपास जारी आहे. गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने तपासासाठी एकूण वीस तपास पथके नेमण्यात आली असून तपास सुरु आहे.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिक्षण खात्यातील कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३९) * ६४७३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण खात्यातील सर्व माळी-नि-रखवालदार, हमाल, शिपाई कर्मचा-यांच्या मागण्यांसाठी दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास शिक्षणाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबध्द पदोन्नती देण्यास झालेली दिरंगाई, माळी-नि-रखवालदार कर्मचा-यांचे २४ तास काम, कर्मचा-यांचे गणवेश, शिलाई भत्ता व कामाचे साहित्य देण्यास दिरंगाई, सर्व संवर्गाची रिक्त व पदोन्नतीची पदे न भरल्यामुळे हा मोर्चा काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचा-यांच्या मागण्यांप्रकरणी अनेकदा बैठका व निर्णय घेण्यात आल्यानंतरही त्यावर अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निर्णय न घेतल्यामुळे हमाल, शिपाई, कर्मचारी यांच्या पदोन्नत्या होत नाहीत, याकारणास्तव त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागण्या त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग कार्यालयातील शिपायांना कालबध्द पदोन्नती देण्यात आली असून शाळा शिपाई व हमाल यांना कालबध्द पदोन्नती देण्याचे काम बृहन्मुंबई महागनरपालिकेमार्फत सुरु आहे.

कर्मचाऱ्यांना गणवेश व साहित्य देण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असून ती पूर्ण झाल्यानंतर शिलाई भत्ता देण्यात येईल.

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार भरण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रार्थनास्थळांवर कारवाई करण्याचे न्यायालयाने दिलेले आदेश**

**(४०) * २८४३ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १९ हजार, ७१४ प्रार्थनास्थळांवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रार्थनास्थळांवर कारवाई करतांना धार्मिक भावना दुखावू नये याकरिता कारवाईच्या दरम्यान कोणती दक्षता घेतली आहे,

(३) तसेच सदरच्या प्रार्थनास्थळांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासन विचार करणार आहे काय

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १०४/२०१० मध्ये अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत दिनांक ०९.०१.२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

अ) दिनांक ०५.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय समिती व महानगरपालिकांस्तरीय समिती (मुंबई वगळून) यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत प्रतिज्ञापत्र संबंधित सचिवांनी सादर करावे.

ब) उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या वर्गीकरणानुसार अनधिकृत धार्मिक स्थळांबाबतची आकडेवारीची विभागणी प्रतिज्ञापत्रात समाविष्ट करावी.

क) यापूर्वी न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार सर्व महानगरपालिकांमध्ये समिती गठीत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात यावी.

ड) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन दिनांक २९.०९.२००९ नंतरची अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करण्यासाठी त्वरीत पावले उचलण्याबाबत, सर्व नियोजन प्राधिकाऱ्यांना निर्देश देण्याबाबत विचार करण्यात यावा.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई दहिसर (पश्चिम) मध्ये असलेला कांदरपाडा परिसरातील लक्ष्मण म्हात्रे मार्गावरील वृक्ष डांबर टाकून नष्ट केल्याबाबत**

**(४१) * ३८०७ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई दहिसर (पश्चिम) मध्ये असलेला कांदरपाडा परिसरातील लक्ष्मण म्हात्रे मार्ग या रस्त्यालगत उभ्या राहणाऱ्या वाहनांना जागा मिळावी म्हणून या मार्गावरील वृक्षाभोवती डांबर टाकून जिवंत वृक्ष नष्ट करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक जनतेने शासनाकडे तसेच महानगरपालिका प्रभाग विभाग दहिसर-बोरीवली अधिकाऱ्यांकडे गेले सहा महिन्यांपासून तसेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये तक्रारी करुनसुध्दा कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरची झाडे नष्ट करण्या-यांवर कारवाई करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांबाबत**

**(४२) * ३२९१ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेतील ठेकेदारांच्या हाताखाली सुमारे ४ हजार कंत्राटी कामगार काम करतात, ठेकेदारांमार्फत काम करणाऱ्या या कंत्राटी कामगारांना पालिका ४३२ रुपये प्रतिदिन देते, मात्र ठेकेदार या कामगारांना दरमहा ४ ते ५ हजारही वेतन देत नाहीत असे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरीब कामगारांची लूट थांबवण्याच्या दृष्टीने त्यांना त्यांच्या कामाचे पैसे थेट बँकेत जमा करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, ती कधीपासून कार्यान्वित होणार आहेत व त्याचा तपशिल काय आहे,
(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी तक्रार पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त झाली आहे.
(२) सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेने अशा कंत्राटी कामगारांचे दरमहाचे वेतन धनादेशाव्दारे अदा करणे ठेकेदारांवर बंधनकारक केले आहे.
(३) तसेच दिनांक १.४.२०१५ पासून कंत्राटी कामगारांचे वेतन थेट बँकेत जमा करणेची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्याचे निश्चित केले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(४३) * ४८०८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या प्रारुप विकास आराखडयात शासनाचे टी.पी. (शहर विकास आराखडा) चा अंतर्भाव करण्यासह प्रचलित बांधकाम नियमावलीमध्ये काही गौण स्वरुपातील फेरबदलांना प्रशासकीय मंजुरी देण्याची लोकप्रतिनिधी व बांधकाम क्षेत्रातील संघटना यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तुत प्रकरणी मा.विधान परिषद सदस्य यांच्याकडून दि. २५ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) प्रस्तृत प्रकरणी नाशिक शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्याबाबतचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.

-----------------

**ठाणे शहरात ७५ टक्के हॉटेल व्यावसायिकांकडे अग्निशमन दलाचे**
**ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याबाबत**

**(४४) * ३५८० श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात ९०० हॉटेल आणि बार असताना त्यातील ७५ टक्के जणांकडे अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरातील अग्निशमन दलाचे नियम मोडणाऱ्या ५३ लेडीज बारचे परवाने ठाणे पोलीसांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये रद्द केलेले परवाने पुन्हा सुरु करण्यासंबंधात दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास काही बारमालक महापौरांना भेटण्यासाठी गेले असता महापालिकेची घसरलेली आर्थिक परिस्थिती या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना महापौरांनी ही चर्चा थांबवून बारमालकांना भेटण्यास गेले त्यामुळे ठाणे महानगरपालिकेतील नगरसेवकांनी त्यावर आक्षेप घेवून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रितसर व शांततेने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांविरुध्द महानगरपालिकेच्यावतीने नवपाडा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ज्या हॉटेल व बार व्यावसायिकांकडे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नाही अशा व्यावसायिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) तसेच, शांततेने आंदोलन करणा-या आंदोलकांना सोडण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस विभागाकडील प्राप्त अहवालानुसार ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये हॉटेल, बार, आयस्क्रिम पार्लर, व्हडीओ गेम पार्लर इ. ८६७ हॉटेल परवानाधारक असून त्यापैकी २३६ परवानाधारकांना ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून ना-हरकत दाखले देण्यात आले आहेत. म्हणजेच सुमारे ७२ % हॉटेल व्यावसायिकांकडे अग्निशमन दलाचे ना-हरकत दाखले नाहीत अशी वस्तुस्थिती आहे.

(२) अंशतः खरे आहे. दिनांक २९.१२.२०१४ रोजी बार मालकांचे शिष्टमंडळ महापैरांना अनैपचारिकरित्या भेटण्यासाठी आले होते. तसेच प्रकरणी काही नगरसेवकांनी आक्षेप घेऊन आंदोलन केले होते.

(३) दिनांक २९.१२.२०१४ रोजीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही आंदोलकांविरुध्द तक्रार पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली नाही. तथापि, दिनांक ०५.०१.२०१५ रोजी दुपारी ०२.४५ वाजण्याच्या सुमारास ठाणे महानगरपालिका प्रशासकीय भवन, ठाणे येथे केलेल्या आंदोलनकर्त्यांच्या विरुध्द नौपाडा पोलीस स्टेशन येथे क्र. १/४/२०१५ अन्वये प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आला असून कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

(४) ठाणे शहरातील अग्निशमन नियमाचे त्रुटींचे उल्लघंन झाल्याने संबंधित परवानेधारकांना त्रुटींच्या अनुषंगाने उल्लंघन नोटीसा देण्यात आल्या असून पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने जाहिरातींवर केलेला करोडो रुपयांचा खर्च**

**(४५) * ३५३४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने केवळ अडीच महिन्याच्या सत्ता कालावधीत जाहिरातींसाठी १६ कोटी ७३ लाख रुपये मंजूर करून त्यापैकी रुपये १० कोटी इतकी रक्कम वितरीत केली असल्याचा शासननिर्णय दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी निर्गमित केला असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असताना तसेच राज्याची आर्थिक स्थिती नाजूक असताना अशाप्रकारे केवळ दोन-अडीच महिन्याच्या कालावधीत करोडो रुपये जाहिरातीवर खर्च करणे कितपत संयुक्तिक आहे,

(३) त्याचप्रमाणे माहे, ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक १२ जानेवारी, २०१५ या सदर दोन-अडीच महिन्याच्या कालावधीत राज्य शासनाने जाहिरात करण्याबाबत आवश्यक ठरणाऱ्या कोणकोणत्या लोककल्याणकारी योजना अंमलात आणल्या आहेत वा आणण्यात येत आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासन राबवित असलेल्या कल्याणकारी योजनांची व ध्येय धोरणांची माहिती समाजातील सर्व स्तरातील जनतेपर्यंत प्रभाविपणे पोहोचविण्यासाठी जाहिरात व दृक प्रसिध्दी माध्यमांद्वारे नियमितपणे प्रसिध्दी केली जाते. त्याअनुषंगाने राज्यामध्ये विविध ठिकाणी जाहिरातफलक उभारण्यासाठी, सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रु.१६.७३ कोटी (रुपये सोळा कोटी त्र्याहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी रु.१२,८८,९५,०००/- (रुपये १२ कोटी अठ्ठयांशी लक्ष पंच्यान्नव हजार फक्त) इतकी रक्कम वितरीत केली आहे.

-----------------

**अकोला जिल्ह्यातील तेल्हारा शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीचा एकत्रित विकास करण्याबाबत**

**(४६) * २९१८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील तेल्हारा शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याची प्रक्रिया कलम - २६ अंतर्गत करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रक्रिया पूर्ण झाली असल्यास, तेल्हारा शहराच्या मुळ हद्द व वाढीव हद्दीच्या एकत्रित विकास योजनेचा प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अकोला जिल्ह्यातील तेल्हारा नगर परिषदेच्या हद्दवाढीची अधिसूचना दिनांक ३०/६/२००९ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, सदर हद्दवाढीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अकोला यांनी काही दुरुस्त्या सूचविल्या आहेत. सदर दुरुस्त्यांच्या अनुषंगाने शुध्दीपत्रक काढण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त नमूद प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अंतर्गत वाढीव व मूळ हद्दीची एकत्रित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करता येईल.

-----------------

**पुणे येथील एस.आर.ए. ची नवीन नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४७) * ३१९७ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील एस.आर.ए. च्या नवीन नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधीतांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही एस.आर.ए. ची नवीन नियमावलीची अद्यापी अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.आर.ए. ची नवीन नियमावलीची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) (ब) नुसार नगर विकास विभाग, शासन अधिसुचना क्र. टि.पी.एस./१८१२/७८६/ प्र.क्र.२६२/१३/पुनर्बांधणी क्र. ९०/नवि-१३, दि.११.०९.२०१४ अन्वये पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी विशेष नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे. विकासकाने नविन नियमावलीनुसार प्रस्ताव दाखल केल्यास ते मंजुर होऊ शकतात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये वाढत असलेले गैरव्यवहार**

**(४८) * २८२१ डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती शोभाताई फडणवीस, अॅड.अनिल परब, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शासकीय कार्यालयामध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले असून नाशिकसह राज्यभरात गतवर्षी १२६० लाचखोरांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले असून त्यात नाशिक विभागात २११ सापळे टाकून २७० लाचखोरास ताब्यात घेण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात लाचखोरीचे प्रमाण वाढले असून दररोज चार लाचखोरीचे प्रकार घडत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे सन २०१४ मध्ये सापळा प्रकरणी एकूण १२४५ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये १६८१ लोकसेवक गुंतलेले आहेत. त्यापैकी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्रात सन २०१४ मध्ये सापळा प्रकरणी एकूण २११ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये २६९ लोकसेवक गुंतलेले आहेत.

(२) सन २०१५ मध्ये दिनांक १०.०३.२०१५ अखेर राज्यात लाचेच्या सापळा प्रकरणी एकूण २५४ गुन्हे दाखल असून त्यात ३३१ लोकसेवक आरोपी आहेत. तसेच अपसंपदा बाबत १२ गुन्हे नोंद असून त्यामध्ये १८ लोकसेवक गुंतलेले आहेत. त्याचप्रमाणे एक अन्य भ्रष्टाचाराचा गुन्हा नोंद असून त्यामध्ये एक लोकसेवक गुंतलेला आहे. सन २०१४ च्या पहिल्या ३ महिन्यांच्या तुलनेत सापळा प्रकरणी गुन्ह्यात वाढ झाल्याचे दिसून येते.

(३) व (४) राज्यातील सर्व जिल्ह्यातील शहरे / तालुक्याचे ठिकाणी वर्तमानपत्र व इलेक्ट्रनिक मिडीया मार्फतीने जाहिरात करुन, त्याचप्रमाणे तालूक्यांच्या ठिकाणी भरणारे आठवडा बाजार, यात्रा, मेळावे या ठिकाणी अॅन्टी करप्शन ब्युरोचा स्टॉल लावून तेथे अधिकारी व कर्मचा-यांमार्फत माहितीपत्रके व बॅनर्स लावून राज्यामध्ये जनजागृती करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. तसेच शासकीय लोकसेवकांच्या भ्रष्टाचारासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर मोबाईल अॅप उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यावर कोणत्याही लोकसेवकाविरुध्द अॅपद्वारे ऑनलाईन तक्रार पाठविता येते. त्यामध्ये फोटो, ऑडीओ व व्हीडीओ इत्यादी फाईल्स जोडून पाठविण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना टोल फ्री क्रमांक १०६४ वर तक्रार नोंदविता येते. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर "तक्रार" या सदराखाली तसेच फेसबुक पेजवर देखील तक्रार करण्याची सेवा उपलब्ध आहे.

-----------------

**मुंबईतील डोंगरी बालसुधारगृहातील अल्पवयीन आरोपीस अन्य ठिकाणी स्थलांतरीत करीत असतांना कर्तव्यावर असणा-या पोलीस शिपायाचा झालेला मृत्यू**

**(४९) * ३६३३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डोंगरी बालसुधारगृहातील अल्पवयीन आरोपीस अन्य ठिकाणी स्थलांतरीत करतेवेळी दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास सदर आरोपी पळून जात असताना त्यास अटक करण्यास गेलेले कर्तव्यावर असणारे जुहू पोलिस ठाण्याचे पोलिस शिपाई राजेंद्र परशुराम नाईक यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्यू पावलेल्या पोलीस शिपायाच्या कुटूंबास शासनामार्फत किती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) पोलीस कल्याण विभाग यांचेकडून रुपये १२,०००/- व बृहन्मुंबई पोलीस सहकारी पतसंस्था मर्यादीत, नायगांव यांच्याकडून रुपये ५,०००/- अशी एकूण रक्कम रुपये १७,०००/- एवढी सानुग्रह अनुदान रक्कम तातडीची मदत म्हणून त्यांच्या पत्नीस सुपुर्द करण्यात आलेली आहे.

तसेच दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या कुंटुबास शासनामार्फत योग्य ती अधिक मदत मिळण्यासाठी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९, यांचेमार्फतीने स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या मृत्यू नंतर त्यांच्या विधवा पत्नी यांच्याकडून शासकीय सेवा उपदानाची रक्कम अदा करण्याबाबतचे विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन घेण्यात आलेले आहेत. तसेच अपघात विमा संदर्भातील कागदपत्रे दिनांक ०५.०२.२०१५ रोजी न्यु इंडीया ॲशूरंन्स कंपनी, पुणे यांच्याकडे पुढील पुर्ततेकामी सादर करण्यात आलेले आहे.

(३) सद्यस्थितीत गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधीच्या रकमा अदा करण्याचे बाकी असून दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या विधवा पत्नी व आई यांच्यात आर्थिक लाभाच्या हिस्स्यावरुन वाद निर्माण झाल्याने सदरच्या रकमा अदा करण्याचे बाकी आहे.

-----------------

**अमरावती-वडेनरा मार्गावर वाहतूक पोलीस शेतकऱ्यांना त्रास देत असल्याबाबत**

**(५०) * ४४३५ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-वडनेरा मार्गावर वाहतूक पोलीस शेतमाल विक्रीसाठी बाजारात घेऊन जाणा-या शेतक-यांच्या गाडया अडवून त्यांच्याकडून दमदाटी करून पैसे घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना त्रास होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अमरावती शहरात शेतमाल विक्रिसाठी घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या गाडया अडवून त्यांच्याकडून वाहतूक पोलीस पैसे घेत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील पवईच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजिच्या (आयआयटी) आवारात होणारी वृक्षतोड**

**(५१) * ६५३९ श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिच्या (आयआयटी) विस्तारीकरणासाठी ५६५ एकर जमिनीवर असलेल्या वृक्षांची मोठया प्रमाणावर तोड करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संकुलातील जैवविविधतेच्या संवर्धनाकरिता मानव विकास मंत्रालयाने सन २०१३ मध्ये सर्व आयआयटीमध्ये ग्रीन ऑफिस सुरु करण्याची योजना आखली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जैवविविधतेच्या संवर्धनाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील पवई इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (आय.आय.टी) विस्तारीकरणाच्या कामात सदरहू संस्थेमार्फत बाधित वृक्ष छाटणे/कापणे/ पुनर्रोपित करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडून वेळोवेळी परवानगी घेण्यात येते. दिनांक ०६.०८.२०१३ ते २०.१०.२०१४ या कालावधीत देण्यात आलेल्या ६ परवानग्यामध्ये आय.आय.टी च्या विविध विकासकामांत बाधित होणा-या एकूण १२ झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, ६८ झाडे कापणे, १६३ झाडे पुनरोर्पित करणे व २११ झाडे आहेत तशीच राखण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) आय.आय.टी मुंबईच्या अहवालानुसार केंद्र शासनाच्या मानव विकास मंत्रालयाने निर्देशित केल्याप्रमाणे सन २०१४ मध्ये, आय.आय.टी. मुंबईमध्ये ग्रीन ऑफीस कमिटी स्थापन करण्यात आली आहे.

(३) व (४) आय.आय.टी मुंबईच्या अहवालानुसार मुंबईमध्ये सन १९९१ पासून दरवर्षी पावसाळयाच्या जुलै व ऑगस्ट महिन्यात साजरा केल्या जाणा-या वनमहोत्सवांतर्गत दरवर्षी सुमारे १००० ते २००० वृक्षांची लागवड करण्यात येते व त्यापैकी ६० % वृक्ष जिवंत असून या वृक्षांची योग्य काळजी आय.आय.टी. मुंबई मार्फत घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील आरोग्य केंद्रांबाबत**

**(५२) * ४४९६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका हद्दीत ६५ प्रभाग असून त्याठिकाणी केवळ २५ आरोग्य केंद्र असल्याने अनेक प्रभागांना दुस-या प्रभागातील आरोग्य केंद्रावर विसंबून रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महापालिका हद्दीत आरोग्य केंद्रे अथवा पालिकेच्या रुग्णालयांकरिता किती भुखंड राखीव आहेत याची निश्चित माहितीच आरोग्य विभागाला नसल्याची माहिती आरोग्य विभागाने महासभेत दिल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य केंद्र हे प्रभागनिहाय नसून सदरची आरोग्य केंद्र IPHS च्या लोकसंख्येच्या निकषानुसार निर्माण करण्यात आलेली आहेत. तत्कालीन लोकसंख्येनसार २५ आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव १६ आरोग्य केंद्राच्या निर्मितीस शासनाची मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

माहे जानेवारी, २०१५ च्या महासभेपूर्वी शहरातील आरोग्य केंद्र व रुग्णालय आरक्षित भूखंडाची माहिती ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाकडून त्यावेळी आरोग्य विभागास प्राप्त झालेली नव्हती अशी वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) कोळसेवाडी पोलिस ठाण्याची जमिन बनावट कागदपत्र बनवुन बळकाविल्याबाबत**

**(५३) * २७४४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील कोळशेवाडी, पोलिस ठाण्याची जमिन सचिन मिश्रा, खुशबु मिश्रा, राणी मिश्रा आणि राजेंद्र प्रसाद मिश्रा यांनी बनावट दस्ताऐवज तयार करून बळकाविण्याचा प्रयत्न केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागा पोलिस स्टेशनसाठी कायमस्वरूपी संरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी कोळसेवाडी पोलीस स्टेशन गुरनं. ४७८/२०१४ भादंविसं कलम ४२०, ४६८, ४७१, ५०६ प्रमाणे दिनांक ३१.११.२०१४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये चार व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(२) सदर जमिनीवर कोळशेवाडी पोलीस स्टेशनची जागा संरक्षीत करण्यासाठी संरक्षित भिंत बांधण्यात आलेली आहे. सदरची जागा पोलीस स्टेशन कब्जात असून वहीवाट आहे. तसेच महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडून केलेले अतिक्रमण काढण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाच घेतल्या प्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवूनही शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५४) * ४१७९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाच घेतल्याप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवूनही शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार लाच प्रकरणातील दोषी असणारे शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच या दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई न होण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) लाचेच्या सापळा प्रकरणी दोषसिद्धी होऊनही, त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही केली नाही अशी एकूण ३२ प्रकरणे ३१ जानेवारी, २०१५ अखेरीस प्रलंबित होती. दिनांक २६ मार्च, २०१५ अखेरीस १० प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रकरणी संबंधित लोकसेवकांवर नियमानुसार तात्काळ कारवाई करावी तसेच अशी कार्यवाही तात्काळ न केल्यास, त्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिका-यांकडून खुलासे मागविण्यात यावे अशा सूचना दिनांक ३० मार्च, २०१५ च्या पत्रान्वये संबंधित प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील मधुकर पडवळ यांनी बोगस कंपन्या स्थापन करुन गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची केलेली फसवणूक**

**(५५) * ४२८८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमी पैशामध्ये जमीनीचे मालक व्हा अशा फसव्या जाहिराती देवून सर्वसामान्य गुंतवणूकदारांना गंडा घालण्याचे प्रकार ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यासह अन्यत्र वाढीस लागले असून याच पगडीतील फसवणूकीचा प्रकार नुकताच निदर्शनास आला असून ठाणे येथील मधुकर पडवळ यांनी बोगस कंपन्या स्थापन करुन गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार मालाड येथील दशरथ सोंडकर यांनी राबोडी पोलीस ठाण्यात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान नोंदविलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

परंतु, मधुकर पडवळ यांनी बोगस कंपन्या स्थापन करुन गुंतवणुकदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केलेबाबत राबोडी पोलीस ठाण्यामध्ये एक अर्जदार यांचकडून गैरअर्जदार नामे मधुकर पडवळ यांनी वनलक्ष्मी डेव्हलपर्स नावाची कंपनी उघडून १० गुंठे जमीन देतो असे सांगून त्याबाबत पूर्ण पैसे घेऊन त्यानंतर ती कंपनी बंद करुन १० गुंठे जमीन देण्याचे नाकारले म्हणून, सन २०१३ व २०१४ मध्ये अर्जदार यांनी गैरअर्जदार नामे मधुकर पडवळ यांचेविरुध्द तक्रारी अर्ज केलेले आहेत.

(२) व (३) सदर वनलक्ष्मी डेव्हलपर्सचे मालक मधुकर भगवान पडवळ व इतर १३ यांचेविरुध्द दिनांक ०६.०२.२००४ रोजी नौपाडा पोलीस ठाण्यात गुरनं ४९/०४ कलम ४२०, ४३ भादंविसह एमपीआयडी कलम ३ व ४ प्रमाणे गुंतवणूकदारांची फसवणूक झालेबाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा दाखल झाल्याने, व इतर लोकांची देखील फसवणूक झाल्याने मा. न्यायालयाने कोर्ट रिसिव्हर नेमलेला आहे. अर्जदार यांनी मा. न्यायालयात दिनांक ०३.०६.२००८ रोजी त्यांची फसवणूक झाल्याबाबतचे कागदपत्र न्यायालयात हजर केले असता, चौकशी करुन व सदरबाबत न्यायालयामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने तसेच न्यायालयाने कोर्ट रिसिव्हर नेमल्याने अर्जदार यांना संबंधितांकडून दाद मागून घेणेबाबत समज देवून त्यांचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल केलेला आहे.

नौपाडा पोलीस ठाणे येथे दाखल उपरोक्त गुन्ह्यात मधुकर भगवान पडवळ व इतर १३ यांना अटक करण्यात आली असून, तपासाअंती त्यांचेविरुध्द दिनांक ११.०५.२००६ रोजी मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे. सदरची केस ही न्यायप्रविष्ठ असून, न्यायालयाचे आदेशानुसार कोर्ट रिसिव्हर व संबंधितांना मोबदला देण्याचे काम चालू आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग या पर्यटन जिल्हयास सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(५६) * ५९२१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा १५ वर्षापूर्वीपासून पर्यटन जिल्हा असूनही आजतागायत याठिकाणी कोणत्याही सोयीसुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्हयाच्या विकासासाठी मा.मुख्यमंत्री यांनी विशेष धोरण जाहिर करण्याचे विधान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य शासनाने दि. २६.०८.१९९७ च्या शासन निर्णयान्वये सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहिर केला त्यानंतर सिंधुदूर्ग जिल्हयाचा पर्यटनावर आधारित एक बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच केंद्र शासनाच्या १२ व्या वित्त आयोगातंर्गत, राज्य शासनाच्या प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत व जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयातील विकास कामे करण्यात आलेली आहेत.

(२) दि.२९.१.२०१५ रोजी सिंधुदुर्ग पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात मा.मुख्यमंत्री यांनी याठिकाणी पर्यटन विकासाबाबत विशेष धोरण ठरवून योजना राबविण्यात येतील असे जाहीर केले आहे.

(३) व (४) सिंधुदुर्ग पर्यटनाबाबत बैठक घेऊन अँग्रीया बँक प्रकल्पाबाबत केंद्र शासनास ना-हरकत दाखल्यासाठी सादरीकरण करण्यासाठी प्रस्ताव पाठवावा, सी-वर्ल्ड प्रकल्पासाठी भूसंपादन कार्यवाही करणे, तसेच सी-वर्ल्ड प्रकल्प ३००-३५० एकरात सिमित करणे व या प्रकल्पामध्ये कौशल्य विकास संस्थेचा समावेश करणे तसेच स्थानिक नागरिकासाठी कौशल्य विकास करुन त्यांचा या प्रकल्पात समावेश करणे असा निर्णय झालेला असून यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नागाव, अंबेली, पाल्हे, हटाळे येथे सागरी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत

**(५७) * ४५२५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नागाव, अंबेली, पाल्हे, हटाळे येथील मोठया खाडी लगत मोठया प्रमाणात बागायती शेती उपलब्ध असल्याने समुद्रांच्या मोठया उधाणामुळे खाडी लगत असलेल्या भात पिकाखालील जमिनीचे व बागायतीचे मोठया प्रमाणावर नुकसान होते याबाबत दिनांक १ जुलै, २०१३ अन्वये लोकप्रतिनिधींनी सागरी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सागरी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांनी मान्यता दिली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्याप मान्यता न देण्याची कारणे काय आहेत व धुप प्रतिबंधक बंधारे तातडीने बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) नागाव येथे धूपप्रतिबंधक बंधा-याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
आंबेली, पाल्हे, हटाळे येथे बंधारे बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्य शासनाने विडी कामगारांचे किमान वेतनात वाढ केल्यामुळे कारखानदारांनी केलेली रोजगार कपात**

**(५८) * ४६४५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: सोलापूर जिल्ह्यात ७० हजार विडी कामगार असून शासनाने सदर कामगारांच्या किमान वेतनामध्ये वाढ केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने केलेली उक्त किमान वेतनवाढ ही अवाजवी असल्याचे कारण देत विडी कारखानदारांनी रोजगारात मोठ्या प्रमाणात कपात केल्याने या कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार विडी कामगारांच्या रोजगाराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे आहे.
राज्य शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या अधिसूचनेव्दारे राज्यातील विडी कामगारांच्या किमान वेतनामध्ये वाढ केली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ तहसिल कार्यालय (जि.सिंधुदुर्ग) येथे जप्त केलेले वाळूचे ट्रक गायब झाल्याबाबत**

**(५९) * ४६८७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तहसिल कार्यालय (जि.सिंधुदुर्ग) येथे विनापरवाना वाळू वाहतूक करतांना कारवाई करुन जप्त केलेले दोन ट्रक वाळूसह कार्यालयाच्या आवारातून रातोरात गायब झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रत्येक डंपरमध्ये किती किंमतीची वाळू होती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) मौजे कुडाळ तहसिल कार्यालयासमोर विनापरवाना वाळूची वाहतूक करताना पकडलेले दोन डम्पर हे महसूल अधिकारी व कर्मचारी यांचे पथकाने आतील वाळूसह तहसिलदार कार्यालयाच्या आवारात दिनांक १४.०१.२०१५ रोजी उभे केले होते.

परंतू सदरचे दोन्ही डंम्पर आरोपीतांनी चोरुन नेलेबाबत कुडाळ पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०६/१४ भादंविसं कलम ३७९, १८६, ३४ सह जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) (८) अन्वये दिनांक १५.०१.२०१५ रोजी दाखल आहे.

सदर दोन्ही डंम्परमध्ये प्रत्येक रुपये ३६,०००/- अशी एकूण रुपये ७२,०००/- हजार रुपयेची वाळू होती.

या प्रकरणी दोन आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून एका आरोपीस दिनांक ०५.०२.२०१५ रोजी अटकपूव जमीन मा. न्यायालयाच्या आदेशानुसार मंजूर झालेला असून त्या आरोपीतास कुडाळ पोलीस स्टेशन येथे हजार राहणेबाबत आदेश दिलेला आहे. परंतू सदर आरोपीत हा कुडाळ पोलीस स्टेशन येथे हजर राहीलेला नाही. सदर आरोपीताचा तसेच वाळूसह चोरी झालेल्या एका डंम्परचा शोध घेणे सुरु आहे. याप्रकरणी आरोपीतांकडून रुपये ३६,०००/- किंमतीची वाळू हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हा तपासधीन आहे.

-----------------

**पुणे येथील कर्वेनगर आणि वारजे माळवाडीतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याबाबत**

**(६०) * ५०४१ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कर्वेनगर आणि वारजे माळवाडीतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी बांधण्यात येणा-या उड्डाणपूलाचे काम मागील २ वर्षापासून प्रलंबित असल्याने येथे वाहतूकीची मोठया प्रमाणात कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाहतूक कोंडीमुळे येथील नागरिकांना तसेच विद्‌यार्थ्यांना रस्ता ओलांडताना अतोनात त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उड्डाण पूल त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

वारजे कर्वेनगर परिसरामधील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी कमिन्स कॉलेज चौक व युनिव्हर्सल चौक या दोन ठिकाणी उड्डाणपूलाची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

यापैकी कमिन्स कॉलेज चौक येथील रस्त्यावर अधिक वाहतुक असल्याने पोलीस उपआयुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग यांनी दिनांक १६.८.२०१३ रोजी सदरचे काम सुरु करण्यासाठी ना-हरकत पत्र दिले असून दिनांक ३०.८.२०१३ रोजी प्रत्यक्ष काम सुरु करणेत आले आहे.

तसेच सदर रस्त्यावरील पुलाचे कामामध्ये येत असलेल्या जलवाहिन्या, पावसाचे पाणी वाहून नेणा-या वाहिन्या व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या विद्‌युत केबल शिफ्ट कराव्या लागत असल्याने या रस्त्यावर मेट्रो प्रकल्पास अडथळा होण्याच्या शक्यतेमुळे सुधारीत संकल्पचित्र सादरीकरण करणेत आले. तसेच सदर कामामध्ये अडथळा ठरत असलेली झाडे काढण्याची परवानगी दिनांक १६.१.२०१५ रोजी मिळाली असून अशा विविध अडचणींमुळे उड्डाणपुलाचे काम अपेक्षित गतीने सुरु नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.

कर्वे नगर चौकाचे दोन्ही बाजुस नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी भुयारी मार्ग बांधण्यात आले असुन त्याचा वापर नागरिकांकडून होत असल्याने रस्ता ओलांडणे सोईचे झाले आहे.
(३) कमिन्स कॉलेज चौकीमधील उड्डाणपूलाचे काम प्रगतीपथावर असून सदर उड्डाणपूलाचे काम ऑक्टोबर २०१५ अखेर पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदाराला देणेत आले आहे. मात्र युनिव्हर्सल चौक येथील उड्डाणपूलाचे काम (युनिव्हर्सल चौक ते वारजे उड्डाणपूलाच्या दरम्यानचे) भूसंपादना अभावी प्रलंबित असून भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १६ यांचेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घाटकोपर (मुंबई) येथील 'रमाबाई आंबेडकर' नगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांनी घरे मिळण्याची केलेली मागणी**

**(६१) * ५१९२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर (मुंबई) येथील 'रमाबाई आंबेडकर' नगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबीरातल्या रहिवाश्यांकडे सन १९८० पासूनचे पुरावे असूनही त्यांना अपात्र ठरविण्यात आल्यामुळे त्याबाबतची सत्यता पडताळून त्यांना त्वरीत घरे मिळण्याबाबतची मागणी संबंधित रहिवाश्यांनी मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) रमाबाई नगर, घाटकोपर (मुंबई), सी.टी.एस. क्र. १९४ (पै) येथील १३.५ एकर (५४६३४.५० चौ.मी.) इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड त्यावरील झोपड्या व म्हाडाच्या संक्रमण शिबीरांच्या इमारतीसह (इमारत क्र. ८४ ते ९३) शांतीसागर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था यांना पुनर्वसन योजने अंतर्गत म्हाडाकडून दि. २६.०५.२००१ च्या करारनाम्याव्दारे वितरीत करण्यात आला आहे. शासनाने दि. १०.०१.२००८ च्या पत्रान्वये सदर भूखंडावर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(१०) अन्वये योजना राबविण्यास काही अटी व शर्तीवर मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संक्रमण गाळयातील व झोपडपट्टीतील पात्र सभासदांचे पुनर्वसन तसेच म्हाडाचा वाटा म्हणून म्हाडाला एकूण बांधकाम क्षेत्रापैकी ४५% हिस्सा उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. ०९.०२.२००९ रोजी आशय पत्र दिले होते. तथापि सदर आशय पत्र प्राधिकरणाने दि. २२.०१.२०१० रोजी रद्द केले. त्या विरुध्द मा.उच्चाधिकार समिती समोर दाखल केलेल्या अर्जावर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्यांच्या दि. २७.०८.२०१४ च्या आदेशान्वये सदर योजनेचे पुनरुज्जीवन केले असुन सदर योजना पुन्हा कार्यान्वीत करण्यास काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. त्यानुसार संक्रमण गाळे तसेच झोपडपट्टी यामधील पात्र सभासदांच्या पुनर्वसनासह म्हाडाच्या वाटयास येणारे ४५% इतके बांधकाम क्षेत्र सदर संस्थेने प्रथमत: म्हाडास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तशा आशयाचे हमीपत्र मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडून मान्यता घेऊन ते झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर संस्थेने सादर करावयाचे आहे. त्यानुसार शांतीनगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्थेने आवश्यक ते हमीपत्र दि. १७.११.२०१४ रोजी सादर केले असून या भूखंडावरील संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांच्या पात्रतेबाबत कागदोपत्री पुराव्याच्या आधारे तपासणी करुन योग्य तो निर्णय तातडीने घेण्याचे म्हाडास कळविण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ओझर (ता.जि.नाशिक) येथील संरक्षण विभागाच्या विमानतळावर अधिका-यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त पार्टीचे केलेले आयोजन**

**(६२) * ५२१० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर (ता.जि.नाशिक) येथील संरक्षण विभागाच्या अखत्यारितील अतिसंवेदनशील विमानतळावरच सार्वजनिक विभागातील अधिका-यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त पार्टीचे आयोजन करण्यात आल्याची गंभीर बाब दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पार्टीसाठी मद्य परवानगीच्या अटी व शर्तीचाही भंग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संवेदनशील असणा-या विमानतळावर पार्टीचे आयोजन करणा-या आयोजक, उपस्थित व परवानगी देणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद प्रकरणी दिंडोरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०३/२०१५ म.पो.अ. १९५१ चे कलम ३६, १३४, ११२, ११७, ३३ (डब्ल्यु)१, १३१ व सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ प्रमाणे ४ आरोपी विरुद्ध दि.०२/०२/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.

(२) होय,

अट क्र.८(१) व ९ चा भंग केल्याने अनुज्ञाप्ती धारकाविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांनी विभागीय गुन्हा नं.३६/२०१५ दि.०३/०२/१५ अन्वये नोंद करुन आरोपपत्र बजावले असून पुढील कार्यवाही चालु आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या समितीची स्थापना करण्यात आलेली नाही.

(४) दाखल गुन्ह्याचा तपासावरुन गुन्ह्यातील ४ आरोपीपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपींना जामीन मिळाला आहे. एक आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीनसाठी याचिका दाखल केली असून न्यायालयाने त्यांना तात्पुरता जामीन मंजूर केलेला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(६३) * ६४७६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत चैतन्यनगर शिवमंदिर चौक ते तिरोडा ब्रु. या रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनचालकांसह परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत चैतन्यनगर शिवमंदिर चौक ते तिरोडा ब्रु. या रस्त्याचे काम दि. २०/९/२०११ रोजी सुरु करण्यात आले आहे. या अंतर्गत एकूण ६ रस्ते प्रस्तावित असून ४ रस्ते पूर्ण झाले आहेत. उर्वरित रस्त्यावर मल:निस्सारण वाहिनीचे काम केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनिवल मिशन योजने अंतर्गतसुरु असल्याने ताप्तुरत्या स्वरुपात रस्त्याचे काम स्थगित होते. सद्यस्थितीत रस्त्याचे व नालीचे काम सुरु करण्यात आले असून ते पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे. उर्वरित काम हे जागेची व निधीची उपलब्धता विचारात घेवून पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**न्हावा-शेवा ते शिवडी यादरम्यानच्या प्रस्तावित सागरी सेतू प्रकल्पाबाबत**

**(६४) * ५५५३ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावा-शेवा ते शिवडी यादरम्यान २२ किलोमीटर लांबीचा सागरी सेतू बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुंबई ट्रान्सहर्बर लिंक प्रकल्पासाठी कोणतीही कंपनी पुढे न आल्याने निविदा प्रक्रिया सप्टेंबर, २०१३ मध्ये रद्द करुन एमएमआरडीए ने इंजिनिअरिंग प्रॉक्युरमेंट अॅण्ड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) या कंपनीसोबत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या बांधकामासंदर्भात जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान जायका बँकेच्या प्रतिनिधींनी प्रस्तावित ट्रान्सहार्बर लिंक मार्गाचे सर्वेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे व या प्रकल्पाचे काम त्वरित हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई पारबंदर प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर (PPP-Public Private Partnership) करणेकरीता निविदा बोलावण्यात आल्या होत्या. तथापि, या निविदाप्रक्रियेला प्रतिसाद प्राप्त झाला नाही. तदनंतर या प्रकल्पाची अंमलबजावणी जपान इंटरनॅशनल कार्पोरेशन एजन्सी, (JICA) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरींग प्रोक्युरमेंट अॅड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) तत्वावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

(३) नाही, तथापि, याबाबत जायका (JICA) या संस्थेच्या प्रतिनिधींसोबत जुलै २०१४ मध्ये प्राथमिक चर्चा झाली आहे.

(४) या प्रकल्पाची अंमलबजावणी जायका (JICA) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरिंग प्रोक्युरमेंट अ‍ॅड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) तत्वावर करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला असून या प्रस्तावास केद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रस्तावित आहे.

-----------------

**यवतमाळ शहरात पार्कींग झोन निर्माण करण्याबाबत**

**(६५) * ६३८० श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात वाहतुकीची अत्यंत कोंडी होत असून पार्कींगच्या जागेवर खाजगी दुकाने उभारल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ शहरात पार्कींग झोन निर्माण करण्याबाबत स्थनिकामधून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ शहरात पार्कींग झोन निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) जागेचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील निर्माण होणा-या कच-यासाठी शासनाने डंम्पिग ग्राऊंडकरिता जागा उपलब्ध करून देणेबाबत**

**(६६) * ५७७२ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दरदिवशी हजारो टन कचरा जमा होणा-या देवनार आणि मुलूंड येथील डंम्पिग ग्राऊंडला मुदत वाढ देऊन यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला आदेश दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील निर्माण होणा-या कच-यासाठी राज्य शासनाने डंम्पिग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनहित याचिका क्रमांक २१७/२००९ मधील सिव्हील अ‍ॅप्लिकेशन क्रमांक २२१/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४.११.२०१४ रोजीच्या आदेशान्वये देवनार व मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंडला आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाची मुदतवाढ दिली असून, डंपिंग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा शोधण्याबाबत शासनाने लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिलेले आहेत.

(२) व (३) मुंबई महानगरपालिकेतर्फे कच-यावर प्रक्रिया करण्यासाठी तळोजा येथे जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनास सादर केला आहे. तळोजा येथील सामायिक भराव भूमी प्रकल्पामध्ये एकूण उपलब्ध असलेल्या १२६ हेक्टर जमिनीपैकी मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्यासाठी तयार करण्यात येत असलेल्या प्रकल्पाकरिता अंदाजे ६६ हेक्टर जमीन आवश्यक असल्यामुळे उर्वरित ६० हेक्टर जमीन मुंबई महानगरपालिकेस देण्यासाठी उपलब्ध होऊ शकते. सदर ६० हेक्टर जमिन बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मुंबईतील विक्रोळी पार्क साईड येथील आनंदनगर आणि वर्षानगर ते स्मशानभूमी परिसरात महापालिकेकडून अवेळी करण्यात येणारा पाणीपुरवठा**

**(६७) * ६१५६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पार्क साईड येथील आनंदनगर आणि वर्षानगर ते स्मशानभूमी परिसरात महानगरपालिकेकडून गत १० ते १२ वर्षापासून रात्रौ १२.३० ते १.०० मध्ये वा त्यादरम्यान पाणीपुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा वेळेत बदल करुन सकाळी किंवा सांयकाळी पाणीपुरवठा करण्याची मागणी मा.महानगरपालिका आयुक्त यांचेकडे स्थानिक नागरिकांनी सातत्याने करुन वेळेत बदल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त परिसरात पाणीपुरवठ्याच्या वेळेत बदल करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. मुंबई विक्रोळी पार्क साईट येथील वर्षानगर शोषण टाकीला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आनंदगड उदंचन केंद्रातून रात्रौ १०.१० ते पहाटे ०१.५५ पर्यंत पाणी पुरवठा करण्यात येत आहे व त्यापुढे वर्षानगर परिसरात पाणी वितरण करण्याचे काम वर्षानगर तरुण मित्रमंडळ या रहिवाशी संस्थेमार्फत करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठयाच्या वेळेत बदल करण्याबाबतचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) सदर भागातील पाणी पुरवठयाच्या दाबामध्ये सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत जुने पंप बदलून नवीन पंप बसविण्यात आलेले आहेत. आनंदगड टाकीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयाच्या वेळेत व परिक्षेत्रात सद्य:स्थितीत असलेल्या पाणीपुरवठयाच्या यंत्रणेव्दारे फेरबदल करण्याची चाचणी महानगरपालिकेमार्फत सुरु असून पाणी पुरवठयाच्या दाबामध्ये सुसुत्रता आणण्याचे काम महानगरपालिकेकडून सुरु आहे. तसेच डोंगराळ भागांसाठी असलेल्या आनंदगड उदंचन केंद्राला महानगरपालिकेने जगदुशा आऊट लेट वर मोठया क्षमतेचा पंप बसवून पाणी पुरवठा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे जेणेकरुन वर्षानगर टाकीला दिवसा पाणी पुरवठा करता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भोसरी (जि.पुणे) येथील इंद्रायणीनगरच्या राजवाड्यातील अश्विनी वारकडे या मुलीने आत्महत्या केल्याबाबत**

**(६८) * २८४४ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी (जि.पुणे) येथील इंद्रायणीनगरच्या राजवाड्यातील अश्विनी वारकडे या मुलीने रोडरोमिओच्या छेडछेडीला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छेडछाडप्रकरणी आश्विनी वारकडे या मुलीने व तिच्या आईने या प्रकरणी अनेक वेळा पोलिसांकडे तक्रार करुनही या प्रकरणी पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नसल्याने सदरची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी पोलिस उपनिरिक्षक व सहाय्यक पोलिस निरिक्षक यांना निलंबित करण्यात आले असून या प्रकरणी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याप्रकरणी शासन चौकशी करणार आहे काय,

(४) असल्यास, छेडछाडीच्या व बलात्कारांच्या तक्रारीकडे गांभीर्याने लक्ष घालून आरोपींना पकडण्यास विलंब होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदरचे खटले द्रुतगती न्यायालयात दाखल करून तातडीने निर्णय घेणार आहे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) फिर्यादी या तक्रार देण्यासाठी एमआयडीसी भोसरी पो.स्टे.येथे आल्या असता, फिर्यादी पोलिस स्टेशन येथेच घेणे आवश्यक असताना संबंधित सहा. पो. निरिक्षक यांनी फिर्यादीस लांडेवाडी पोलिस चौकी येथे पाठविले. तेथील महिला पोलिस उपनिरिक्षक यांनी फिर्यादी यांची तक्रार त्यांनी सांगितल्याप्रमाणे न घेता गुन्ह्याचे स्वरुप कमी करुन अदखलपात्र गुन्हा क्र. ३/२०१५, भादंवक ३२३,५०४,३४ अन्वये नोंदविला व आरोपीविरुध्द आवश्यक ती कारवाई केली नाही. कर्तव्यातील कसुरीबाबत सहा. पोलिस निरिक्षक व महिला पोलिस उपनिरीक्षक यांना निलंबित करण्यात आले असून वरिष्ट पोलिस निरीक्षक व पोलिस निरिक्षक (गुन्हे) यांना कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आली आहे.

(४) मयत मुलीच्या आईच्या फिर्यादीनुसार आरोपीविरुध्द भोसरी पालीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३५४, ३५४(ड), ३२३, ५०४, ३०५, ३०६, ३४ बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११(१), १२ नुसार गु.क्र. ३/२०१५ नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपास करुन न्यायालयात दिनांक २३.२.२०१५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यास तात्काळ गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते. महिलांविषयक गुन्हे घडु नये, म्हणून सन २०१४ मध्ये २१ वेळा मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी हे स्वतंत्र पथके तसार करुन त्यांचे हद्दित वेळोवेळी पेट्रोलिंग करतात व महिलांच्या सुरक्षिततेबाबत दक्षता घेतात.

(५) सदर प्रकरणाचा पोलीस तपास पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर घटनेतील सर्व आरोपींना योग्य ती कायदेशीर शिक्षा तातडीने देण्याबाबत शासनाने प्रयत्नशील आहे.

-----------------

**मुंबई कलिना विद्यापीठाच्या परिसरात होणाऱ्या पर्यावरणाच्या परिषदेकरिता झालेली वृक्षतोड**

**(६९) * ३८२१ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कलिना विद्यापीठाच्या परिसरात होणाऱ्या पाच दिवसांच्या विज्ञान व पर्यावरणाच्या परिषदेकरिता मोठा शामियाना उभारण्यासाठी वृक्षांचा अडथळा होत असल्याने, वृक्ष प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता या परिसरातील २८ वृक्ष मुळासकट तोडण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि मुंबई कलिना विद्यापीठाच्या परिसरात शामियाना उभारणीच्या कामात अडथळा करणा-या २८ वृक्षांना पुनरोपित करण्यास वृक्ष प्राधिकरण समितीने मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या आधारे २८ वृक्ष, मुंबई विद्यापिठ, कलिना विद्यानगरी परिसरात पुनरोपित करण्यात आले आहेत. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उर्वरित प्रशासकीय कार्यवाही चालू आहे.

-----------------

**पुणे रेल्वे स्टेशन परिसरात अनेक खाजगी वाहनचालकांकडे प्रवासी वाहतुकीचा परवाना "बॅज" नसतांना वाहन चालवित असल्याबाबत**

**(७०) * ३२९४ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे रेल्वे स्टेशन परिसरात अनेक खाजगी वाहने प्रवासी वाहतुकीचा परवाना नसतांना व चालकाकडे "बॅज" नसताना देखील पुणे-मुंबई प्रवासी वाहतूक करतात व वाहतूक पोलिसांच्या समोर हा सर्व प्रकार घडत असतांना देखील यावर कारवाई केली जात नाही अशा आशयाचे निवेदन दि पुना टॅक्सीमेन कन्झ्युमर्स को.ऑप.सोसायटीने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरी आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबतीत काही कारवाई करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचे निवेदन वाहतूक शाखा, पुणे शहर आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या अभिलेखावर आढळून आलेले नाही.

(२) व (३) पुणे शहर पोलीस वाहतूक शाखेने सन २०१४ मध्ये विना परमिट, विना बॅज, विना परवाना व अवैध प्रवासी वाहतूकीच्या अनुक्रमे ९५, २९१७, १७६१९ व १५४३ केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या भरारी पथकामार्फत प्रवासी वाहतूकीच्या परवाना नसताना तसेच बॅज नसताना प्रवासी वाहतूक करणा-या १६२ व २३४ वाहनांवर माहे डिसेंबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक महानगरपालिकेमधील विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत**

**(७१) * ४८१४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमधील विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याचा दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासनाने निर्णय घेतलेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेला कोटयवधी रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागूनही अद्याप पर्यंत कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उच्चस्तरीय चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्याची नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनामधील विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ३७३७८ च्या अनुषंगाने दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजीच्या चर्चेमधील नाशिक महानगरपालिकेच्या विविध कामांमध्ये प्रशासकीय पातळीवर चूक झाली असेल तर निश्चितपणे उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) हे खरे आहे. तथापि, या प्रकरणांची चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक नगररचनाकारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक**

**(७२) * ४७३१ श्री.हेमंत टकले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक नगररचनाकार श्री.पांडुरंग शेळके यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दहा हजार रुपयाची लाच स्वीकारताना दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर नगररचनाकारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आरोपी लोकसेवक श्री.पांडुरंग बाबुराव शेळके यांना दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.पांडुरंग बाबुराव शेळके, सहाय्यक नगररचनाकार, संचालक नगररचना यांचे कार्यालय, ठाणे यांनी फिर्यादी मोहंम्मद फुरकान मोहम्मंदअली कुरेशी यांच्याकडून त्यांच्या मौजे कान्हार्ले, ता.मुरबाड येथील जमिनीचा अंतिम आखणी केलेला प्लॅन मंजूर करण्यासाठी रु. १०,०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारली असता, त्यांना दि. ०९.०१.२०१५ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले.

या प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.पांडुरंग बाबुराव शेळके, सहाय्यक नगररचनाकार यांचेविरुध्द ठाणे नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ कलम ७, १३(१) (ड) सह १३ (२) अन्वये दि.०९.०१.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि. ०९.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. आरोपीस मा.न्यायालयाने दि. १४.०१.२०१५ रोजी जामीनावर मुक्त केले आहे.

आरोपी लोकसेवक श्री.पांडूरंग बाबुराव शेळके, सहाय्यक नगररचानाकार याना दि. १८.०२.२०१५ च्या शासन आदेशान्वये अटक केल्याच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

आरोपी लोकसेवकाविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील छत्रपती शिवाजी रुग्णालय, (कळवा) परिसरात सीसीटीव्ही बसविण्याबाबत**

**(७३) * ३५३५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील रुग्णालयांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसविण्याचे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार कळवा ठाणे येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय परिसरात रूपये १.५ कोटी रक्कमेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय परिसरात आतापर्यंत किती सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत,
(४) त्याचप्रमाणे त्याबाबतच्या पुढील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अर्भक चोरीला जाण्याच्या घटनांचा परामर्श घेतल्यानंतर, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी करावयाच्या सुधारणा/उपाययोजना याबद्दल मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ५६/२००९ वर मा.न्यायालयाने दिनांक ०६.०५.२००९ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार रुग्णालयातील सर्व प्रवेशद्वारे व बहिर्गमन द्वारे, संवेदनशील वार्ड जसे की, नवजात शिशु वार्ड (Neonatal Wards), प्रसूतीपश्चात वार्ड (Post natal Wards) व लहान मुलांचा वार्ड हे सी.सी.टी.व्ही.च्या देखरेखीखाली असावे असे सूचित केले आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय परिसरात आतापर्यंत १३ आणि संलग्न राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथे ११ असे एकूण २४ सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. तसेच अस्तित्वात असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरांचे जाळे विस्तारित करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यानुसार रुग्णालयातील सद्यस्थितीतील सी.सी.टी.व्ही. कॅमेरांची संख्या २४ ने वाढविण्यात येणार आहे.

सदर कामासाठी रुपये २४,९६,३७८/- एवढया रकमेच्या मागविलेल्या निविदा दिनांक १६.०१.२०१५ रोजी उघडण्यात आल्या असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पुणे शहरासाठी अडीचपट टी.डी.आर. देण्याबाबत

**(७४) * ३१९८ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरासाठी अडीचपट टी.डी.आर. देण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधीताकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी या प्रकरणी निर्णय घेण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरासाठी अडीचपट टी.डी.आर. देण्याबाबत तसेच एका झोनचा टी.डी.आर. अन्य इतरत्र झोनमध्ये वापरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) राज्यातील बऱ्याचशा नागरी क्षेत्रांसाठी मंजूर विकास आराखडयांमध्ये समावेशक आरक्षणे व टी.डी.आर. ची तरतूद आहे. समावेशक आरक्षणे व टी.डी.आर. ही विकास योजना अंमलबजावणीची अत्यंत प्रभावी माध्यमे आहेत. तथापि आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता जमिनीच्या मोबदल्यात संपादनाची वाजवी रक्कम जमीन मालकास प्राप्त होणे, विकास योजना प्रस्तावांचे अंमलबजावणीमध्ये वाढ होणे यासाठी विद्यमान तरतुदी अधिक आकर्षक व स्विकारार्ह करण्यासाठी त्यात मुलभूत फेरबदल करणेचा सर्वकष विचार करुन योग्य त्या सुधारणा सुचविण्यासाठी अभ्यासगट नेमला होता. त्यास अनुसरुन संचालक, नगर रचना यांनी स्थापन केलेल्या अभ्यासगटाने संपूर्ण विकास हक्क हस्तांतरणाचे नियम व समावेशक आरक्षणाचे नियम यांचा सविस्तर अभ्यास करुन त्यांचा अहवाल शासनास सादर केला असून पूर्ण विचाराअंती विकास हक्क हस्तांतरण व समावेशक आरक्षणासंबंधीचे सुधारित धोरण संपूर्ण राज्यामध्ये महानगरपालिका तसेच नगरपालिका क्षेत्रासाठी लागू करण्याचा मनोदय आहे.

-----------------

### नाशिक महानगरपालिकेचा विकास आराखडा शासनाने जाहीर करण्यापूर्वीच वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याबाबत

**(७५) * ५२८२ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेचा विकास आराखडा शासनाने जाहीर करण्यापूर्वीच वर्तमानपत्रात प्रसिध्द होणे व अन्य अनियमीत बाबींची आवश्यक ती चौकशी करुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याबाबत शासनाने संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेल्या निर्देशानुसार चौकशीची सुरु असलेल्या कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, संचालक, नगररचना यांचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने याप्रकरणी अनियमितता करणारे संबंधित दोषी कोण आहेत,

(४) संबंधित दोषीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, चौकशी पूर्ण झाली नसल्यास, ती केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) सन्माननीय विधान परिषद सदस्य यांनी दि. १७ ऑगस्ट, २०१३ व दि. १९ ऑगस्ट, २०१३ रोजी, "नाशिक शहराच्या विकास आराखडयात अनियमिततेची व गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कारवाई करणेबाबत" या शासनास केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संचालक नगररचना यांच्याकडून दि. १२ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती दर्शक अहवाल मागविण्यात आला आहे. त्या अुनषंगाने सहसंचालक, नगररचना नाशिक विभाग, यांचे मार्फत विद्यमान जमिन वापर नकाशा तपासण्याचे तसेच प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरु असून ते अद्याप पूर्ण झालेले नाही. वरीलप्रमाणे सविस्तर चौकशी पूर्ण होऊन अदययावत अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर यासंबंधीची पुढील उचित कार्यवाही करण्याचे योजीले आहे.

-----------------

### सटाणा (जि.नाशिक ) तालुक्यातील एकलव्य नगरात गुप्तधनासाठी नरबळी देण्याचा केलेला प्रयत्न

**(७६) * ३६४१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील एकलव्य नगरात ८ कोटीचे गुप्तधन मिळावे म्हणून पोटच्या पोरीला बळी देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व अंधश्रध्देसाठी प्रवृत्त करणा-या भोंदूबाबांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सदर घटनेबाबत भा.दं.वि.कलम १४३, १४७, १४९ आणि अंधश्रद्धा निर्मुलन कायदा कलम-३ अन्वये दि.१९/०१/२०१५ रोजी सटाणा पोलीस स्टेशन येथे २९/२०१५ हा गुन्हा दाखल आहे.
(२) व (३) होय,

नमूद घटनेच्या चौकशीत निष्पन्न झाले की, ३ भोंदूबाबा आरोपी यांनी फीर्यादीचे वडील, आई व भाऊ या आरोपींना विश्वासात घेऊन घरातील ८ कोटी रुपये किंमतीचे गुप्तधन काढण्यासाठी पुजा करुन फीर्यादीस मारहाण केली व फीर्यादीचा नरबळी देण्याचा प्रयत्न केला म्हणून सहा आरोपींविरुद्ध उक्त नमूद गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील ६ आरोपींना अटक करुन पोलीस कस्टडी घेण्यात आली. सद्यस्थितीत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर करुन अनधिकृतपणे बांधलेली इमारत नियमित करण्यासाठी पालिकेला दिलेल्या भूखंडाचाही वापर करण्यात आल्याबाबत**

**(७७) * ४४४४ श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर करुन मुंबईतील ग्रँटरोड येथे अनधिकृतपणे बांधलेली २५ मजली इमारत नियमित करण्यासाठी सोसायटीला ४८२ चौ.मी.चा भूखंड पालिकेला द्यावा लागला होता आता याच सोसायटीच्या शेजारी २१ मजली इमारत उभी राहिली असून ती इमारत बांधण्यासाठी पालिकेला दिलेल्या या भूखंडाचाही वापर करण्यात आला असल्याचे १८ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

मे.देशभूषण को.ऑ.हौ.सो. यांनी भूकर क्र. ६५४, मलबार हिल विभाग या भूखंडावर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(७) खाली पुनर्विकासाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेला होता. सदर आराखडयामध्ये पुनर्विकसित इमारत क्र. १ व विक्री घटक इमारत क्र.२ या दोन इमारती समाविष्ट आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनर्विकसित इमारतीस दिनांक २१.१०.२००४ रोजी प्रारंभ प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर पुनर्विकसित इमारत क्र. १ चे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तथापि काही अटींची

पूर्तता झालेली नसल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. तद्‌नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १८.११.२०१३ रोजी पाटीलवाडीच्या रहिवाश्यांची तक्रार प्राप्त झाली. त्यानुसार सदर भूभागापैकी ४८० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूभाग हा या भूभागाच्या शेजारील मातृमंदिर को.ऑ.हॉ. सोसायटीने अधिकचे बांधकाम केल्याबद्दल दंडात्मक कारवाईस्वरुप बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात यावा, असे तत्कालिन महापालिका आयुक्तांच्या आदेशात नमूद करण्यात आलेले होते. तथापि, सदर भूखंड महापालिकेस हस्तांतर केल्याची कोणतीही कागदपत्रे आढळून येत नाहीत. तसेच मालमत्ता पत्रकामध्ये सध्याच्या मालकाचे नाव नमूद करण्यात आलेले आहे. दरम्यानचे कालावधीत विकासकाने पुनर्विकसित इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका १६५३/२०१४ दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या आदेशानुसार संबंधित तक्रारदार, विधी खाते, सहाय्यक आयुक्त डी विभाग, वास्तूविशारद व विकासक यांचेसमवेत संयुक्त बैठका घेण्यात आल्या. त्यानुसार ४८० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरचे चटई क्षेत्र हे प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत राखून ठेवण्याचा व रहिवाश्यांच्या पुनवर्सनासाठी बांधलेल्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेणेत आला. सदर इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेच्या केईएम आणि नायर रुग्णालयातील क्ष-किरण विभागात काम करणा-या कर्मचा-यांना किरणोत्सर्गाचा दुष्परिणाम होत असल्याबाबत**

**(७८) * ४४९७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या केईएम आणि नायर रुग्णालयातील क्ष-किरण विभागात काम करणा-या कर्मचा-यांना किरणोत्सर्गाचा दुष्परिणाम मोजण्यासाठी देण्यात येणारे थर्मोल्युनिमिसेन्ट डोसिमीटर (टीएलडी) बॅच गेल्या ३ वर्षापासून देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अ‍ॅटोमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्डच्या (ईआरबी) नियमानुसार किरणोत्सर्गाच्या कक्षेत काम करणा-यांना बॅच देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

काही तांत्रिक अडचणीमुळे रेनेनटेक लॅबोरेटरी प्रा. लि. यांनी थर्मोल्युमिनीसेन्ट डोसिमीटर (टीएलडी) बॅचचा पुरवठा बंदा केला होता. सद्य:स्थितीत बॅचचा पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला आहे.

नायर रुग्णालयामध्ये थर्मोल्युमिनीसेन्ट डोसिमीटर (टीएलडी) बॅच जुलै, २०१४ ते डिसेंबर,२०१४ या दरम्यान उपलब्ध नव्हते. परंतु, जानेवारी, २०१५ पासून सातत्याने उपलब्ध करण्याता आले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) नाही.

(४) थर्मोल्युमिनीसेन्ट डोसिमीटर (टीएलडी) बॅचेस हे किरणोत्सर्गाच्या दुष्परिणामाचे मोजमाप करण्यासाठी वापरले जातात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येत नाही. परंतु किरणोत्सर्गाच्या कक्षात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किरणोत्सर्गाच्या दुष्परिणामांपासून संरक्षित करण्यासाठी कॉल्युमीटर, प्रोटेक्टीव बॅरिअर्स, लीड एप्रोन आणि गोनाडल शिल्डस सारखी उपकरणे उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हाडाच्या सन २०१० मधील सोडतीत झालेला गैरव्यवहार**

**(७९) * ४५४७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या सन २०१० मधील सोडतीत दलालांनी बोगस अर्ज केले आणि त्यापैकी काही बोगस अर्जदार विजेते ठरल्याचे निदर्शनास आल्याने अशा बोगस अर्जदारांच्या घरांचे वितरण रद्द करुन प्रतिक्षा यादीवरील विजेत्यांना घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र या प्रतिक्षा यादीवरील काही विजेत्यांनी बनावट जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करुन घरे लाटल्याचे तपासा दरम्यान अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या दलाल आणि म्हाडातील संबधित भ्रष्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१)हे खरे आहे.

(२) व (३) म्हाडाच्या सन २०१० व २०१२ च्या सोडती मधील यशस्वी व प्रतिक्षा यादी वरील एकूण ५ अर्जदारांनी म्हाडास सादर केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे संशयास्पद आढळल्याने सदर प्रकरण मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांचेकडे दि. २३.१२.२०१४ च्या पत्रान्वये पुढील चौकशीकरीता व पडताळणी करीता मुंबई मंडळ, म्हाडा यांनी सादर केलेले असुन या प्रकरणाची पुढील चौकशी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांचेकडून सुरु आहे. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांच्या पडताळणीअंती ती कागदपत्रे बनावट असल्याचे आढळल्यास संबंधिताचे वितरणपत्र रद्द करण्यात येईलच. त्याखेरीज त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, असे म्हाडाला कळविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्याची मोडकळीस आलेली इमारत**

**(८०) * ४२९४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्याची इमारत सन १९०२ मधील असल्यामुळे ही इमारत अतिशय धोकादायक असून येथे केवळ १० पोलीस कर्मचारी असल्याने त्यांच्यावर कामाचा मोठ्या प्रमाणात ताण पडत असल्याचे माहे, जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच पोलीसांची पदे वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) माळशिरस (जि.सोलापूर) पोलीस स्टेशन ब्रिटीशकालीन इमारतीमध्ये १९०७ पासुन कार्यरत असून इमारत सुस्थितीत आहे. या पोलीस स्टेशनमध्ये मंजूर संख्याबळ ५१ असुन, येथे ५० कर्मचारी कार्यरत आहे. गरजेनुसार इतर ठिकाणचे अतिरिक्त कर्मचाऱ्यांचाही वापर करण्यात येतो.

या पोलीस स्टेशनसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या इमारतीच्या बांधकामासाठी रुपये ६६.३९ लक्ष इतकी रक्कम उपलब्ध करण्यात आली आहे.

-----------------

**नवी मुंबईतील पदपथांवर राहणाऱ्या मुलींचे अपहरण करुन अनैतिक कामासाठी विक्री करणारी टोळी गुन्हे शाखेने पकडल्याबाबत**

**(८१) * ४६९१ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत पदपथांवर राहणाऱ्या मुलींचे अपहरण करुन अनैतिक कामासाठी त्यांची विक्री करणारी टोळी गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने नवी मुंबई परिसरातील उरण येथे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून टोळीतील चौघांना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अटक करण्यात आलेल्या आरोपीमध्ये एक वकील आणि यापूर्वी बारबाला असलेली त्याच्या पत्नीचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. सदर प्रकरणी एकूण चार आरोपी असून, त्यामध्ये एक वकील व त्याची पत्नी (पूर्वीची बारबाला) यांचा समावेश आहे. सदर चारही आरोपींना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) व (४) होय, सदर प्रकरणी फिर्यादीरुन नेरुळ पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दिनांक ०४/११/२०१३ रोजी गुन्हा रजिस्टर नं. ३१२/२०१३, भा.दं.वि. कलम ३६३, ३६६ (अ), ३६७, ३६८, ३७० (५), ३७३, ३४, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सद्यःस्थितीत चारही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील हत्तीबेट पर्यटन स्थळाच्या विकासकामाबाबत

**(८२) * ५१९८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील हत्तीबेट पर्यटन स्थळाच्या डोंगरावर विविध योजनातून कामे करण्यात आली असून वर्षभरापासून शासनाचे या बेटाकडे दुर्लक्ष झाले असून नियोजन मंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळालेली उक्त बेटाची पाणीपुरवठा योजना नियोजन विभागाने जाणीवपूर्वक डावलली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बेटाच्या माथ्यावरील सभा मंडपाचे काम मंजुरीप्रमाणे झाल्यानंतरही त्याचे देयक प्रलंबित ठेवल्याने सदरील बेटाचा विकास थांबला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामाची कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन सदरचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे झाल्याचा अहवाल देवूनही प्रभारी नियोजन अधिकाऱ्यांनी या कामाचे देयक प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच याप्रकरणी संस्थेचे चेअरमन वामन पाटील यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त बेटाची विकास कामे त्वरीत सुरु करण्यास बेटावरील पाणी पुरवठा योजना मंजूर करुन बेटावर झालेल्या कामाचे देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, याबाबतची सद्स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रभारी नियोजन अधिकाऱ्यांनी देयक प्रलंबित ठेवलेली नाहीत. सभामंडपाच्या बांधकामाला खासदार स्थानिक विकास बांधकामाला खासदार स्थानिक विकास कार्यक्रमातुन मंजूरी दिलेली नाही, पत्राचे शेडला मंजूरी दिलेली नाही, हत्ती बेटावरील सभामंडपाचे बांधकाम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे झाले नसल्याचे काम पुर्ण झाल्यावर फोटोवरुन दिसून आलेले आहे, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे बांधकाम झालेले नाही इ. कारणांमुळे निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(४) होय.

(५) व (६) बेटावर झालेल्या कामाचे देयक देण्यासाठी काम आहे. त्या परिस्थितीत मंजूरी देण्याबाबत केंद्र शासनास कळविले आहे.

-----------------

## मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपी संजय दत्त यांच्या फर्लो रजेबाबत

**(८३) * ५२१३ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपी संजय दत्त याची फर्लो रजा वाढविण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय दत्त याला देण्यात आलेली फर्लो रजा बेकायदेशीररित्या आणि चुकीच्या पध्दतीने वाढविण्याचा प्रयत्न झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय दत्त याला सन २०१३-१४ या काळात पॅरोल आणि फर्लो रजा मंजूर करणा-या उप महानिरिक्षक (कारागृह) यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच, पॅरोल आणि फर्लो रजेबाबतच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(६) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बंदी क्र.सी-१६६५६, संजय दत्त याची फर्लो (संचित) रजा वाढीचा अर्ज दिनांक ०९.०१.२०१५ रोजी कारागृह उप-महानिरीक्षक पुणे विभाग, पुणे यांच्या आदेशान्वये नामंजूर करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) बंदी क्र. सी-१६६५६- संजय दत्त यास फर्लो (संचित) रजा मंजूर करणाऱ्या उप-महानिरीक्षक (कारागृह) यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

(४) संबंधीत अधिकाऱ्यांच्या खुलाश्यासह अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, पुणे यांचा या प्रकरणीचा अहवाल नुकताच शासनास प्राप्त झाला असून त्याची शासनस्तरावर छाननी करुन आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) होय.

(६) बंदयास देय ठरणाऱ्या अभिवचन व संचित रजेच्या नियमांमध्ये शासन स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून त्यानुसार नियमात बदल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नागपूर येथे सन २०१४ मध्ये आयोजित राष्ट्रीय कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांचा झालेला अपघाती मृत्यू

**(८४) * ६३७९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये नागपूर येथे आयोजित राष्ट्रीय कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील कृषी विभागांतर्गत खाजगी वाहनासाठी निर्बंध असताना अपघातामध्ये शेतक-यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातामध्ये मदती अभावी व तातडीच्या औषधोपचाराअभावी जखमी शेतक-यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मृत शेतक-यांच्या कुटुंबाला कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी शासनातर्फे पोलीस स्टेशन सेलू येथे गु.र.क्र.४०/२०१४, भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ मोटर वाहन कायदा सहकलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे. सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सेलू येथे न्यायप्रविष्ठ आहे.

(४) मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी रु. ५ लाख दिनांक ३०/०४/२०१४ रोजी धनादेशाद्वारे देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.